बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | गुरूवार,दि.२६जुलै २०२४ | वर्षे ३रे | अंक३६१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

अजित बेटा कितना खाया!

मुंबई: आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राजकीय नेत्यांचे विविध ठिकाणी दौरे सुरु असून मतदारसंघाचा आढावा घेण्यात येत आहे. मात्र, निवडणुकीच्या आधी राज्याच्या राजकारणात सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये आरोप–प्रत्यारोपाचं राजकारण सुरु आहे. आता काँग्रेसचे नेते तथा विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरील ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याच्या आरोपावरून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली. तसेच राज्य सरकारने सुरु केलेल्या लाडकी बहीण योजनेवरूनही विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला. महाराष्ट्रात सर्वाधिक अत्याचाराच्या घटना घडत असल्याचंही त्यांनी म्हटलं.

मनोज जरांगेच्या भूमिकेकडे लागले लक्ष

उपोषण स्थगित!!

मनोज जरांगे यांचे उपोषण १३ ऑगस्टपर्यंत स्थगित

सलाईन लावून बेगडी उपोषण मी करणार नाही

पून्हा महाराष्ट्रभर फिरण्याचे दिले संकेत

जालना/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी त्यांचं उपोषण १३ ऑगस्टपर्यंत स्थगित केलं आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा प्रश्न १३ ऑगस्टपर्यंत सोडवावा, नोंदी असलेल्या मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यावं अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मंगळवारी (२३ जुलै) रात्री त्यांची प्रकृती खालावली होती. त्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना जबरदस्तीने सलाईन लावली. मनोज जरांगे म्हणाले, सलाईन लावून बेगडी उपोषण मी करणार नाही. त्याऐवजी मी उपोषण स्थगित करतो. राज्य सरकारने १३ ऑगस्टपर्यंत आम्हाला आरक्षण द्यावं. खरंतर माझी इच्छा होती की मला सलाईन लावू नये. मात्र माझ्या सहकाऱ्यांनी माझं ऐकलं नाही. त्यामुळे मी स्वतःहून उपोषण स्थगित करून सरकारला वेळ देण्याचा निर्णय घेतला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले, सलाईन लावून बेगडी उपोषण करण्याला काही अर्थ नाही, सलाईन लावून, एका जागेवर पडून राहून मी उपोषण करणार नाही. मी असं केलं तर तो बेगडीपणा म्हटला जाईल. अशा प्रकारचं उपोषण मी करणार नाही. त्यापेक्षा मी असं उपोषण न केलेलं बरं. मी सलाईन लावून उपोषणाला बसल्याने सरकारलाही काही फरक पडणार नाही. उलट ते या उपोषणाला गांभीर्याने घेणार नाहीत.

...तर महाराष्ट्र पुन्हा ढवळून निघेल

सलाईन लावून उपोषण करण्याला काही अर्थ नाही. त्याने सरकारची थोडीफार दमछाक होईल. परंतु, मी आता हे आंदोलन स्थगित केल्यावर सरकारची दमछाक होणार नाही आणि ते देखील या आंदोलनाला किती गांभीर्याने घेतील हे मला माहिती नाही. कारण सलाईन लावल्यानंतर मला काही होणार नाही याची त्यांना कल्पना आहे. त्यामुळे ते गांभीर्याने कामं करणार नाहीत. सलाईन लावल्याने याच्या शरीराला काही होत नाही असा ते विचार करतील. मात्र मी सलाईन न लावता उपोषण चालू ठेवलं तर महाराष्ट्र पुन्हा ढवळून निघू शकतो, या मतावर मी आता आलो आहे. त्यामुळे मी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. नंतर मी पुढच्या कामाला लागेन.

मनोज जरांगे पुढे काय करणार?

जरांगे पाटील म्हणाले, सलाईन लावून इथे पडून राहण्यापेक्षा मी १०–१२ दिवस महाराष्ट्रभर फिरेन. वेगवेगळ्या मतदारसंघात जाऊन मराठा समाजाची तयारी करेन. तिथे मोर्चे आणि रॅली काढण्याची तयारी करेन. सरकारमधील लोकांचा जीव त्यांच्या खुर्चीत आहे, ती खुर्ची कशी धोक्यात येईल त्यासाठी मी काम करेन. मी इथे पडून काय करणार? तसेच मी इथेच पडून राहिलो तर हे लोक मला सलाईन लावत राहणार. म्हणूनच मी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. अशा प्रकारच्या उपोषणाने समाजाला न्याय मिळेल की नाही हे माहिती नाही.

कोल्हापूर जिल्ह्याला महापुराचा धोका वाढला

सतर्कता : स्थलांतराचे प्रमाण वाढले

कोल्हापूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्ह्यातील मुसळधार पाऊस अजूनही सुरूच आहे. पंचगंगा नदी धोका पातळीजवळ पोहोचली आहे. अवघ्या पाच इंचावर धोका पातळी पोहोचली असल्याने शासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. तर कोल्हापूर शहरांमध्ये महापालिकेने वॉररूम सुरु केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पावसाचा मुक्काम हटायचे नाव घेत नाही. आजही पावसाने धुमाकूळ घातला. शहरामध्ये पावसाची उघडीप होती. दुपारी तीन वाजल्यानंतर मुसळधार पावसाने झोडपून काढले. जिल्ह्याच्या अन्य भागांत जोरदार पर्जन्यवृष्टी झाली आहे. करवीर, शिरोळ तालुक्यातील ग्रामीण भागात पुराचे पाणी येत असल्याने गतीने स्थलांतर होत आहे. जनावरांना सुरक्षित स्थळी हलवले जात आहे. अनेक ठिकाणी घरे पडण्याचे प्रकार

पान २ वर...

कोल्हापुरात वॉर रूम सुरु

पंचगंगा नदी इशारा पातळी गाठत असल्याने कोल्हापूर महापालिकेच्या मुख्य इमारतीमधील स्थायी समिती सभागृहात सेंट्रल वॉररूम आजपासून सुरू करण्यात आली आहे. महापालिकेने यापूर्वी अग्निशमन विभाग, चारही विभागीय कार्यालयांमध्ये आपत्तीच्या काळात व्यवस्थापनेसाठी व पूर परिस्थितीच्या काळात नागरिकांच्या सोईसाठी मदत कक्ष सुरू केले आहे. पुराच्या कालावधीमध्ये येथे संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांनी केले आहे.

वंचितच्या आरक्षण यात्रेला उद्यापासून सुरुवात!

प्रकाश आंबेडकर : सलोख्यासाठी आरक्षण यात्रा

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी महाराष्ट्रात वनवा पेटू नये. महाराष्ट्र शांत रहावा. सलोखा टिकून रहावा या दृष्टिकोनातून आम्ही २५ तारखेपासून आरक्षण बचाव यात्रा सुरू करत आहोत. उद्या चैत्यभूमीपासून ही यात्रा सुरू होणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.कोल्हापूर, सांगली, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, बीड, परभणी, नांदेड, यवतमाळ, अमरावती, अकोला, जालना, बुलढाणा आणि औरंगाबाद या जिल्ह्यातून आरक्षण बचाव यात्रा जाणार आहे. ७ ऑगस्ट रोजी औरंगाबाद येथे जाहीर सभा होऊन या यात्रेची सांगता होणार असल्याचे आंबेडकर यांनी सांगितले.

आंबेडकर म्हणाले की, एकीकडे ओबीसी समाज प्रचंड घाबरलेला आहे. विशेषतः छोटा ओबीसी घटक घाबरलेला आहे. १२ दिवसांत लहान ओबीसी नेत्यांवर हल्ला झाला आहे. नाभिक समाजाची दुकाने जाळली आहेत. जी माहिती आमच्यापर्यंत आलेली आहे की, लहान ओबीसींच्या दुकानावर जायचे नाही, काही विकत घ्यायचे नाही असेही आदेश निघाले आहेत. ही परिस्थिती अत्यंत स्फोटक आहे. मध्यंतरी शरद पवार यांचे स्टेटमेंट होते की, आम्ही विधानसभेला २२५ आमदार निवडून आणणार आहोत. यामुळे राज्यातील परिस्थिती अजून भयाण झालेली

पान २ वर...

खरीप पीकविमा तातडीने वितरित करा

धनंजय मुंडे : मंत्रालयात पीकविमा संदर्भात बैठक

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात खरीप २०२३ मध्ये अग्रीम २५% प्रमाणे वितरित झालेल्या पिकविम्या नंतर उर्वरित नैसर्गिक आपत्ती नुकसान व अंतिम पीक कापणी प्रयोगानंतर सरासरी उत्पन्नात झालेली घट यातील फरक रक्कम यासंदर्भात कंपनीने तयार केलेले अहवाल पुनर्तपासनी करावेत व तातडीने शेतकऱ्यांचा उर्वरित विमा अदा करावा, असे निर्देश आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी संबंधित विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. बीड जिल्ह्यासह बुलढाणा, यवतमाळ यांसह विविध जिल्ह्यातील प्रलंबित पीक विमा याबाबत आज कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

काही ठिकाणी पीक नुकसानी बाबतची माहिती विमा कंपनीस उशिरा मिळाल्या असल्याचे कंपनीच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी संबंधित नुकसानीच्या अहवालांची बारकाईने पुनर्तपासनी केली जावी. अंतिम पीक कापणी प्रयोगानंतर द्यावयाच्या अंतिम रक्कमा निश्चित करताना सरासरी उत्पन्न व अन्य निकषांचा योग्य पद्धतीने विचार व्हावा, अशा सूचना देखील धनंजय मुंडे यांनी दिल्या. या बैठकीस कृषी विभागाच्या प्रधानसचिव व्ही.राधा, कृषीआयुक्त विजयकुमार आवटे तसेच कृषी विभागातील अधिकारी आणि पिक विमा कंपनीचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. खरीप २०२३ मध्ये बीड जिल्ह्यातील १८ लाख ५१ हजार अर्जाद्वारे

पान २ वर...

श्याम मानव लवकरच तुतारी गटात!

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांच्या एका दाव्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ चालू झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी अनिल देशमुख राज्याचे गृहमंत्री असताना त्यांच्यावर दबाव टाकला होता. फडणवीसांनी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे, विधान परिषदेचे आमदार अनिल परब यांना तुरुंगात टाकण्याचा डाव रचला होता. असं श्याम मानव यांनी म्हटलं होतं. मानव यांच्या या आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली. पाठोपाठ माजी गृहमंत्री व विद्यमान आमदार अनिल देशमुख यांनी देखील मानव यांच्या दाव्यांना दुजोरा दिला. तसेच देशमुख म्हणाले, माझ्याकडे यासंबंधीचे पुरावे आहेत. श्याम मानव म्हणाले, अनिल देशमुख

पान २ वर...

बंटी–बबली'चा गुंतवणूकदारांना गंडा

बोंबला : टपाल विभागाचे एजंट बनून फसवणूक

नागपूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

हिंगण्यातील एका दाम्पत्याने टपाल विभागाचे एजंट बनून नागरिकांना सव्वादोन कोटी रुपयांचा गंडा घातला. ही घटना हिंगणा पोलीस ठाण्यांतर्गत उघडकीस आली आहे. पोलिसांनी नलिनी पुरुषोत्तम तांबुलकर (५२) रा. महाजनवाडी यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत आरोपी महिलेला अटक केली आहे. मात्र, तिचा पती फरार आहे. प्रदीप किसन खंगार (५०) आणि वंदना प्रदीप खंगार (४५) रा. रायपूर, हिंगणा असे आरोपी दाम्पत्याचे नाव आहे.

ठकबाज खंगारने शेकडो ठेवीदारांकडून आरडी आणि एफडीएच्या नावे पैसे घेतले. मात्र, त्यांच्या टपाल खात्यात जमा केले नाही. रायपूर ग्रामपंचायत येथील रहिवासी प्रदीप खंगारने पत्नीच्या नावावर टपाल खात्याची एजन्सी घेतली. लोकांच्या घरी जाऊन तो बचत योजनांसाठी पैसे गोळा करीत होता. पंचवीस ते तीस वर्षांपासून या क्षेत्रात काम करीत असल्याने खातेदारांचा विश्वास संपादन केला होता. दैनंदिन पैसे वसुलीसाठी तो फिरायचा. अचानक २७ जून २०२४ पासून तो बेपत्ता झाला. त्यामुळे ग्राहकांनी

पान २ वर...

बापरे! गेवराईमध्ये अवैध गुटख्याचा अड्डा?

कारवाई | अवैध गुटख्याची गाडी गेवराई पोलिसांच्या ताब्यात

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या अनेक दिवसांपासून गेवराई शहरातून बीड जिल्ह्यातील विविध भागात अवैध गुटख्याचा धंदा सुरू आहे. बीड जिल्हा प्रशासनाचा छुप्या पाठिंब्यावर या धंद्याने उच्छाद मांडलाय. तरीही, हा धंदा बंद व्हावा, असे वाटत नाही. गुटखा माफियाकडून वेळेवर मळवट भरला जात असल्याने, अवैध गुटख्यावर आणि संबंधित व्यापाऱ्यावर कारवाई होत नसल्याची चर्चा असून, मंगळवार ता. २३ रोजी गेवराई पोलीसांनी लाखो रुपयांचा अवैध गुटख्याची असंख्य पोती जप्त करून मोठी कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे.

गेवराई तालुक्यात गुटखा माफियांचा जोर वाढलेला असून, लाखो रुपयांचा गुटखा शहरात येण्याचा प्रकार काही नवीन नाही. मंगळवारी भर दिवसा दुपारी ३ वाजता पर राज्यातून आलेला गोवा गुटख्याने भरलेला एक ट्रक गुटखा माफियाच्या गोडावूनला खाली करण्यासाठी पांढरवाडी फाट्याजवळ पोहचला होता. कुणीतरी अज्ञात व्यक्तीने पोलीस ठाण्यात फोन करून गुटखा पकडला, अशी माहिती देवून ४६ लाखाचा गुटखा आणि ट्रक पोलिसांच्या ताब्यात दिला.

गुटखा ट्रक पोलीस ठाण्यात

सदर पकडलेला गुटखा ट्रक हा दिनांक २२ जुलै रोजी दुपारच्या सुमारास गेवराई शहरात दाखल झालेला होता सायंकाळपर्यंत या ट्रक मधील गुटखा पोती गायप करण्याचे काम चालू होते यानंतर ज्या ठिकाणी हा ट्रक पोचणार होता अशा बीडच्या गुटखा माफी अशी तोड पाणी न झाल्याने हा ट्रक गेवराई पोलिसांच्या स्वाधीन खबर देऊन करण्यात आला असल्याची चर्चा आहे

गुटखाची वीस होते गायप!

पर राज्यातून भरून आलेला गुटखा ट्रक पूर्णपणे भरलेला होता परंतु गेवराई पोलीस घटनास्थळी पोहोचू पर्यंत त्यातील वीस पोती गायप झाल्याची चर्चा दिवसभर गेवराई शहरात ऐकायला मिळाली.

या बाबत अधिक माहिती अशी की काल दिनांक २२ जुलै सोमवार या दिवशी दुपारी गोवा गुटख्याने भरलेला ट्रक गुटखा माफियाने विक्री साठी शहरात

पान २ वर...

गुटखा माफिया कोण ?

पर राज्यातून आलेला गुटखा ट्रक हा बीडच्या एका गुटखा माफिया कडे जाणार होता. त्यानंतर या गुटख्याची विल्हेवाट सदर गुटखा माफिया लावत असे, हे दररोजचे रुटीन होते मात्र हा ट्रक मध्येच लुटला गेल्याने हा गुटखा माफिया उघड झाला नाही परंतु पोलीस याचा शोध घेतील का व बीडचा गुटखा माफिया कोण हे उघड होईल का?

४६ लाख २० हजार रुपयांचा गुटखा व १५ लाखाची ट्रक जप्त

सदर कारवाईत गोवा गुटखा चे २४० पोती व १५ लाखाची ट्रक जप्त करण्यात आली असून अन्न सुरक्षा अधिकारी म. बा. गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये जप्ती पंचनामा करण्यात आला.

असे आदेश न्यायालय कसे देऊ शकतं?

सुप्रीम कोर्टाची मद्रास उच्च न्यायालयाच्या 'त्या' निर्णयाला स्थगिती

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारताच्या राज्यघटनेनं प्रत्येक नागरिकाला विशिष्ट असे अधिकार व स्वातंत्र्य बहाल केली आहेत. देशाच्या न्यायव्यवस्थेसमोर येणाऱ्या अनेक खटल्यांमध्ये या अधिकार व स्वातंत्र्यांचा उल्लेख किंवा संदर्भ घेतला जातो. पण सर्वोच्च न्यायालयात सध्या चालू असलेल्या एका प्रकरणाच्या सुनावणीमध्ये चक्क ठळसहीं ी लश ऋीसींशप अर्थात विसरण्याचा अधिकार चर्चेत आला आहे. संबंधित प्रकरणामध्ये आरोपीचा विसरण्याचा अधिकार मान्य करता येईल का? यावर सर्वोच्च न्यायालयाकडून आढावा घेतला जात आहे.सर्वोच्च न्यायालयात एका व्यक्तीने दाखल केलेल्या याचिकेवर सध्या सुनावणी चालू आहे. या खटल्यातील आरोपीवर एका महिलेचं लैंगिक शोषण करण्याचा आरोप होता. या आरोपासाठी त्याच्यावर खटला देखील चालवण्यात आला. मात्र, काही महिन्यांपूर्वी मद्रास उच्च न्यायालयाने त्याची निर्दोष मुक्तता केली. पण त्यानंतर त्याने मद्रास उच्च न्यायालयात त्याला ठळसहीं ढे इश ऋीसींशप अर्थात सार्वजनिक जीवनात खटल्याच्या निमित्ताने त्याचा झालेला आरोपी असा उल्लेख काढून टाकण्यासंदर्भातील

पान २ वर...

मद्रास उच्च न्यायालयाचा निकाल

कार्तिकच्या मागणीवर मद्रास उच्च न्यायालयाने काही दिवसांपूर्वी 'इंडिया कानून' या वेबसाईटला त्यांच्याकडील खटल्याचं निकालपत्र व त्यासंदर्भातील वार्तांकन काढून टाकण्याचे निर्देश दिले. हे निकालपत्र व वार्तांकनातून निर्दोष सुटलेल्या कार्तिकची ओळख जाहीर होत आहे, असा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद न्यायालयाने मान्य केला.

अधिक राजकीय!

नाही म्हटले तरी गेल्या काही महिन्यांतील राजकीय धकाधक आणि त्यामुळे झालेली पक्षीय पडझड यामुळे अर्थमंत्री निर्मला सीतारामन थकलेल्या असणार. निदान त्यांच्या आजच्या अर्थसंकल्पीय भाषणातून तसे वाटत होते. चेहऱ्यावर नेहमीपेक्षा अधिकच गंभीर भाव आणि भाषण त्यांच्या लौकिकाच्या मानाने अगदीच आटोपशीर. वाचनही तसे सपाट. परिचित आक्रमकपणा गायब आणि किमान जोशही नाही. असे होते. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत घसघशीत जागांवर पराभव पत्करावा लागल्याने अर्थसंकल्पावर त्या कशाबशा मिळालेल्या विजयाची पडछाया असेल असा अंदाज होताच. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी तो चुकणार नाही याची पुरेपूर खबरदारी घेतली. बेरोजगार, महिला, शेतकरी इत्यादींवर जनप्रिय घोषणांचा वर्षाव करण्याचा ‘संकल्प’च अर्थमंत्र्यांच्या या घोषणांतून दिसतो. त्यात गैर काही नाही. प्रत्येक अर्थमंत्री आणि त्यांचे सरकार हेच करत असते. अशा वेळी हा वर्षाव खरा किती आणि हल्ली पंचतारांकित हॉटेलांत आयोजित केला जातो तशा ‘रेन डान्स’सारखा किती, याचे विश्लेषण गरजेचे.निर्मलाबाईंच्या अर्थसंकल्पाचा पहिला भाग नऊ मुद्द्यांवर वैश्विक चर्चा करता करता देशासमोरील आव्हानांचे संदर्भासहित स्पष्टीकरण करतो. कृषी क्षेत्रातील घटती उत्पादकता, रोजगारक्षमता आणि कौशल्य, सर्वसमावेशक मानव्य विकास, कारखानदारी आणि सेवाक्षेत्र, नगरविकास, ऊर्जा आणि पायाभूत सोयीसुविधा, संशोधन आणि पुढच्या पिढीच्या आर्थिक सुधारणा अशी ही नऊ कलमे. त्यातून वाचनानंद मिळतो खरा; तथापि त्या त्या मुद्द्यांस उत्तेजन देताना त्यामागील नेमका लाभार्थी कोण, हा प्रश्न मनात आल्याखेरीज राहात नाही. उदाहरणार्थ अचानक केंद्र सरकारला शहरांतील जुन्या इमारतींच्या पुनर्रचनेची फिकीर वाटत असेल तर त्याचा संबंध आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीच्या पुनर्रचना प्रकल्पाशी आहे किंवा काय असा प्रश्न पडतो. दुसरी बाब ऊर्जेबाबत. केंद्राकडून सातत्याने पर्यायी ऊर्जा क्षेत्रास उत्तेजन दिले जात असल्याचे दिसते. त्या क्षेत्राबाबतही असाच प्रश्न पडतो. शेतीत परिवर्तन घडवण्याची भाषा करताना पिकांच्या नव्या वाणासंदर्भात अर्थमंत्री भाष्य करतात. या विषयात केंद्र सरकारने लक्ष घालावे का? कारण आजही अनेक खासगी कंपन्या बियाणे पुरवठ्याच्या क्षेत्रात आहेत. म्हणजे जे खासगी क्षेत्राकडून सुरळीतपणे हाताळले जात आहे त्यात हस्तक्षेपाची गरज केंद्रास का वाटवी? याचा संबंध बियाणे उद्योगातील आंध्रप्रदेशी कंपन्यांशी आहे किंवा काय, अशी शंका कोणास आल्यास गैर काय?अर्थसंकल्पात भर देण्यात आलेला दुसरा विषय म्हणजे रोजगार. बेरोजगारी निर्मूलनासाठी अर्थमंत्री तीन योजना जाहीर करतात, त्यांचे स्वागत. यात काही नावीन्यपूर्ण मुद्दे दिसतात. उदाहरणार्थ रोजगार क्षेत्रात पहिले पाऊल टाकणाऱ्यांचे एका महिन्याचे विद्यावेतन सरकारने भरणे अथवा असे रोजगार देणाऱ्या मोठ्या कंपन्यांचा यासाठीचा खर्च ‘सीएसआर’मधून करण्याची मुभा त्यांना देणे इत्यादी काही आगळे उपाय या संकल्पात आहेत. त्यासाठी सरकारचे अभिनंदन. हे मुद्दे आपल्या ‘न्याय’पत्रातून उचलले असल्याची टीका या संदर्भात काँग्रेसजन करतात. काहींनी तर काँग्रेसच्या ‘न्याय’पत्राची दखल घेतल्याबद्दल अर्थमंत्र्यांचे आभारही मानलेले आहेत. यावर खुद्द अर्थमंत्री वा निदान भाजपने तरी स्पष्टीकरण देणे योग्य. अर्थसंकल्पात कामगारांसाठी औद्योगिक वस्त्यांत निवासी संकुले इत्यादी सोयींबाबतही सरकार काही करू पाहते. हे त्याचे काम नाही. काही गोष्टी बाजारपेठेवर आणि त्यातील स्पर्धकांवर सोडणे इष्ट. उद्योगांसाठी आर्थिक आणि सामाजिक पोषण कसे राहील हे सरकारने पाहावे. पण कामगारांची घरे आदी मुद्द्यांत लक्ष घालून सरकारने स्वत:स न पेलवणाऱ्या जबाबदाऱ्यांत वाढ करण्याची गरज नाही. शैक्षणिक कर्ज स्वस्त करण्याचा अर्थसंकल्पातील प्रयत्न अत्यंत स्तुत्य. तसेच महिलांचे रोजगार क्षेत्रात प्रमाण वाढावे यासाठी आणि एकूणच कर्मचाऱ्यांच्या कौशल्य विकासासाठी केंद्र काही करू पाहते. हेदेखील अभिनंदनीय मुद्दे.हे वगळता अर्थसंकल्पात सर्वाधिक उठून दिसते ती आंध्र प्रदेश आणि बिहार या राज्यांवर केंद्राने केलेली योजना आणि निधीची खैरात. ही दोन राज्ये अनुक्रमे ‘तेलगु देसम’ आणि ‘जनता दल’ यांच्या हाती आहेत आणि या दोनही पक्षांचा पाठिंबा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सत्तास्थैर्यासाठी आवश्यक आहे. तेव्हा या राज्यांस केंद्राकडून झुकते माप मिळेल ही शंका होतीच. ती अपेक्षेपेक्षा अधिक खरी ठरते. खरे तर त्या राज्यांस अधिक काही मिळाले याचे दु:ख नाही. केंद्राच्या सत्तेचे तळे राखण्यात त्या राज्यांचा मोठा वाटा असेल तर त्यांस त्या तळ्यातील पाणीही काहीसे अधिक मिळणार हे ओघाने आलेच. तथापि या अर्थसंकल्पात निवडणुकोत्सुक महाराष्ट्राची वाटाण्याच्या अक्षतांवर करण्यात आलेली बोळवण मात्र वेदनादायी ठरते. राज्यातील सत्ताधाऱ्यांसाठी ही बाब आगामी काळात त्रासदायक ठरणार हे निश्चित. येत्या दोन दिवसांत पॅरिस येथे ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धांस प्रारंभ होईल. ऑलिम्पिक स्पर्धांच्या तोंडावर अर्थसंकल्प हा तसा दुर्मीळ योग. ‘लोकसत्ता’ने तो साधला. ‘अधिक गतिमान, अधिक उत्तुंग, अधिक शक्तिशाली’ हे ऑलिम्पिकचे ब्रीद. सत्ताकारणाच्या ऑलिम्पिक स्पर्धेत सादर झालेल्या आजच्या संकल्पाचे वर्णन ‘अधिक राजकीय’ असे केले जाणे अपरिहार्य ठरते.

संविधानभान : आम्ही चालवू हा पुढे वारसा!



‘‘आपण आपली कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडली, तर आपण हक्कांना पात्र असतो आणि त्या हक्कांचे संरक्षणही होऊ शकते, हे मी माझ्या अशिक्षित मात्र समंजस असलेल्या आईकडून शिकलो आहे.’’ महात्मा गांधींनी १९४७ साली लिहिलेल्या पत्रात म्हटले होते. हे पत्र लिहिले होते युनेस्कोचे संचालक ज्युलियन हक्सले यांना. हे पत्र लिहिले होते कारण गांधींना निमंत्रण आले होते. मानवी हक्कांच्या जाहीरनाम्याबाबत चर्चेसाठी जगभरातील ६० व्यक्तींना बोलावण्यात आले होते. गांधी हक्क आणि कर्तव्ये यांचा परस्परांशी संबंध आहे, अशी मांडणी करतात. किंबहुना हक्कप्राप्तीसाठी कर्तव्य बजावण्याची पूर्वअट आहे, असेच ते सांगू पाहतात. गांधींच्या या मांडणीविषयी मतभेद असू शकतात; मात्र कर्तव्य बजावण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले, हे महत्वाचे आहे.त्यामुळे कर्तव्यांचे पालन करणे गरजेचे आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. संविधानाच्या अनुच्छेद ५१ (क)मधील पहिलेच कर्तव्य आहे ते संविधानाचे पालन करण्याबाबत. संविधान आणि संविधानाने निर्माण केलेल्या आदर्श आणि संस्थांविषयी आदर बाळगला पाहिजे. प्रत्येक नागरिकाचे हे कर्तव्य आहे. लोकप्रतिनिधीदेखील संविधानाची शपथ घेतात कारण संविधानाचे पालन करणे गरजेचे आहे. संविधानिक पदावरील प्रत्येक व्यक्तीने संविधानानुसार कारभार केला पाहिजेच; पण प्रत्येक नागरिकाने संविधानातील मूल्यांविषयी आदर व्यक्त केला पाहिजे. संविधानाद्वारे स्थापित झालेल्या संस्थांचा सन्मान केला पाहिजे. यासोबतच राष्ट्रगीत आणि राष्ट्रध्वज या दोन महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रतीकांचाही सन्मान केला पाहिजे, असा उल्लेख पहिल्याच कर्तव्यामध्ये केला आहे. संविधान किंवा राष्ट्रध्वज यांच्याविषयीचा आदर म्हणजे कोणते कर्मकांड नाही; तर त्या मूल्यांविषयी आदरभाव असणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.दुसरे कर्तव्य असे की स्वातंत्र्य आंदोलनाला ज्यामुळे स्फूर्ती मिळाली अशा आदर्शांची जोपासना करणे आणि त्यानुसार वागणे. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाने कोणती मूल्ये महत्त्वाची मानली? आपण ब्रिटिशांना विरोध केला नाही तर वसाहतवादी, साम्राज्यवादी, शोषणकारी प्रवृत्तींना विरोध केला. स्वातंत्र्यानंतर कॉमनवेल्थमध्ये सामील झाल्यावर नेहरूंना ब्रिटनमधील पत्रकार परिषदेत प्रश्न विचारला गेला की ब्रिटिशांनी इतकी वर्षे तुमच्यावर राज्य केले तरी तुम्ही कॉमनवेल्थमध्ये कसे काय सामील झालात? यावर नेहरू म्हणाले की, याला दोन कारणे आहेत. एक म्हणजे आम्ही भारतीय लोक दीर्घकाळ द्वेष करत नाही आणि दुसरे म्हणजे आमच्या देशात गांधी जन्मले! नेहरूंचे हे उत्तर खास आहे कारण ते प्रेमाचे आणि उदारतेचे महत्त्व अधोरेखित करते. भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाने द्वेषाला नाकारले, प्रेमाला स्वीकारले. या आंदोलनाने जमातवाद धिक्कारला आणि धर्मनिरपेक्षतेला कवेत घेतले. विषमतेवर प्रहार केला आणि समतेचा आग्रह धरला. साम्राज्यवादाला विरोध केला आणि स्वराज्याचा मार्ग धरला. जात धर्माच्या ध्रुवीकरणाची वाट सोडून दिली आणि एकतेची वाट चोखाळली. थोडक्यात, स्वातंत्र्य, समता आणि सहभावाची मूल्यत्रयी आपल्या स्वातंत्र्य आंदोलनात अधिक दृढ झाली. हा आपला समृद्ध वारसा आहे. त्याविषयी आदर बाळगणे हे कर्तव्य आहे, हे खरे तर वेगळे सांगण्याचीही आवश्यकता नाही.

अन्यथा कारवाई करण्याची तंबी

तत्परता : मनसेच्या निवदेणाची दखल

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शहरातील खासगी हॉस्पीटलमध्ये व स्वतंत्र पॅथॉलॉजी लॅबमध्ये प्रत्यक्ष जावून स्टिंग ऑपरेशन केले असता अव्वाच्या–सव्वा दरामध्ये आमच्याकडेच तपासण्या होतात तसेच बाहेरचे रिपोर्ट ग्राह्य धरले जाणार नाहीत आमच्याकडेच तपासण्या करा असा दम दिला जातो. तसेच सर्व पॅथॉलॉजी लॅबचा आढावा घेवून संबंधित लॅब चालक आवश्यक प्रमाणपत्र न घेता लॅब चालवत आहे का व त्या लॅबचालकाची लॅब चालवण्याची पात्रता व तिथे काम करणारे टेक्नीशियन यांचे शिक्षण पुर्ण आहे का? ह्या गोष्टी व तो लॅब चालक कट प्रॅक्टीस करुन नागरिकांची लुट तर करत नाही ना ? याची चौकशी करावी व सर्व नियमांचे पालन होत आहे का याचा आढावा घेण्यात यावा अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली होती अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शहराध्यक्ष करण लोंढे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष ऋषीकेश गिराम पाटील यांच्या वतीने देण्यात आला होता याची दखल घेवून जिल्हा शल्यचिकित्सक बडे यांच्याकडून खासगी डॉक्टर व पॅथॉलॉजी लॅबवाल्यांना नोटीस देण्यात आली आहे.चक्क प्रमापत्र मागितल्यानंतर ज्या महाविद्यालयाचे प्रमाणपत्र आहेत त्या महाविद्यालयचे प्राध्यापक येऊन होत असलेल्या प्रकारास दाबण्याचा प्रकार करत असल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला आहे. तसेच १५–२० हजार रुपये घेऊन डीएमएलटी कोर्स चे प्रमाणपत्र मान्यता नसलेल्या संस्थाचे दिले जाते आणि एकही दिवस संस्थेमध्ये क्लास होत नाहीत असे बोगस प्रमाणपत्र देऊन अनधिकृत लॅब चालवण्यास सहाय्य करतात यांच्यावर देखील कार्यवाही व्हावी अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे.

पान एक वरून

बापरे! गेवराईमध्ये अवैध ...

आणला होता. हा गुटखा पांढरवाडी शिवारात कुठे तरी उतरवून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी गुटखा मफियाने यंत्रणा लावली होती. परंतु शहरातील एका खबऱ्याला माहिती मिळाली. त्यानुसार , पांढरवाडी फाट्याजवळ गुटख्याचा ट्रक अडवून, झडती घेतली असता त्यात गोवा गुटखा असल्याचे दिसले. त्यानंतर तो ट्रक पांढरवाडी रोडला एका विट भट्टीच्या जवळ लपवून गुटखा माफियाशी बोलणी सुरू केली. परंतु तडजोडीची बोलणी फिस्कटली, अशी चर्चा झाली. दरम्यान, पोलीस उपनिरीक्षक कोटकर आणि काही पोलीस कर्मचाऱ्यांनी लपवुन ठेवलेले गुटख्याचे पोते हुडकून काढले. ते ट्रक मध्ये भरून गुटख्याने भरलेला ट्रक घेवून गेले. शहरात आलेला लाखोचा गुटखा कोणाचा ? हा प्रश्न अनुत्तरित राहिला आहे. पोलिसांनी गुटखा माफिया पर्यंत पोहचून पूर्ण प्रकरण उघडकीस आणावे अशी मागणी होत आहे. दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून गेवराई शहरातून बीड जिल्ह्यातील विविध भागात अवैध गुटख्याचा धंदा सुरू आहे. बीड जिल्हा प्रशासनाचा छुप्या पाठिंब्यावर या धंद्याने उच्छाद मांडलाय. तरीही, हा धंदा बंद व्हावा, असे वाटत नाही. गुटखा माफियाकडून वेळेवर मळवट भरला जात असल्याने, अवैध गुटख्यावर आणि संबंधित व्यापाऱ्यावर कारवाई होत नसल्याची चर्चा असून, मंगळवार ता. २३ रोजी गेवराई पोलीसांनी लाखो रुपयांचा अवैध गुटख्याची असंख्य पोती जप्त करून मोठी कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे.

असे आदेश न्यायालय कसे...

अधिकाराचं संरक्षण मिळावं, अशी मागणी केली. सार्वजनिक जीवनातून व कायद्यासंदर्भातील वार्तांकन करणाऱ्या वेबसाइट्सवरून त्या व्यक्तिचे नाव आरोपी म्हणून हटवण्यात यावे. तो गुन्ह्यातून निर्दोष मुक्त झाला असल्यामुळे आरोपी म्हणून त्याचे नाव अशा साइट्सवर राहणे त्याच्यासाठी तापदायक ठरू शकते. आरोपांमधून मुक्त झाल्यामुळे त्या गुन्ह्यासंदर्भात आपण विसरले जावो (ठळसहीं ीं लश षीर्सीशिप) अशी मागणी आरोपीने केली.

कोल्हापूर जिल्ह्याला महापुराचा...

घडले आहेत. पंचगंगा नदी राजाराम बंधारा येथे सायंकाळी सात वाजता पाणी पातळी ४२ फूट ७ इंच होती ती धोका पातळी ४३ फूटजवळ पोहोचली आहे. यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले आहे. राधानगरी धरण ९३ टक्के भरले असून अन्य धरणातील पाणीसाठाही वाढत चालला आहे.

वंचितच्या आरक्षण यात्रेला...

असल्याचेही ड. आंबेडकर यांनी म्हटले आहे. महाराष्ट्रातील ओबीसी नेत्यांना, संघटनांना पक्षाच्या वतीने आम्ही निमंत्रणाचे पत्र लिहिले आहे ते यामध्ये सामील होत आहेत. शरद पवार हे विरोधी पक्षात आहेत त्यांनाही या यात्रेत सहभागी होण्यासाठी निमंत्रित केले आहे.शांतता प्रस्थापित करणे आणि जनजागृती करणे हा आरक्षण बचाव यात्रेचा हेतू असल्याचेही ड. आंबेडकर यांनी नमूद केले.

खरीप पीकविमा तातडीने...

शेतकऱ्यांनी पीकविमा योजनेत सहभाग घेतला होता. आतापर्यंत ३९१ कोटी ९७ लाख रुपये इतका विमा मंजूर करण्यात आला असून, यापैकी ३२८ कोटी रुपयांचे वितरण पूर्ण झाले असून, आणखी ६७ कोटी १२ लाख रुपयांचे वितरण सुरू आहे. स्थानिक नैसर्गिक आपत्ती व अंतिम अहवाल यानुसार या रक्कमेत आणखी वाढ होणार आहे.

श्याम मानव लवकरच

गृहमंत्री असतानाच त्यांच्यावर ईडीने कारवाई सुरू केली होती. त्याच काळात काही लोकांनी देशमुखांना सांगितलं की तुम्हाला ईडीच्या प्रकरणातून स्वतःला सोडवायचं असेल, तर तुम्ही १०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात उद्धव ठाकरे यांचं नाव घ्यावं. तसेच दिशा सालियन बलात्कार आणि हत्या प्रकरणात आदित्य ठाकरेंचं नाव घ्यावं. बेकायदेशीर व्यवहार आणि आर्थिक अफरातफर केल्याप्रकरणी अनिल परब यांचं नाव घ्यावं. मात्र देशमुखांनी तसं केलं नाही. श्याम मानव यांनी केलेल्या दाव्यांनंतर प्रसारमाध्यमांनी थेट अनिल देशमुखांकडे याबाबत विचारणा केली. त्यावर अनिल देशमुख म्हणाले, मला त्यांनी (देवेंद्र फडणवीस) तीन ते चार प्रतिज्ञापत्रं लिहून द्यायला सांगितली होती. मात्र मी त्यांना स्पष्ट सांगितलं की मी कोणावरही खोटे आरोप करणार नाही. त्यानंतर त्यांनी ईडी व सीबीआयला माझ्या मागे लावून मला अटक करायला लावली. तसेच श्याम मानव यांनी केलेला आरोप खरा आहे. माझ्याकडे त्यासंबंधीचे पुरावे देखील आहेत.

बंटी–बबली’चा गुंतवणूकदारांना...

टपाल कार्यालयात जाऊन चौकशी केली असता त्याने २०२२ पासून खातेदारांची रक्कम भरली नसल्याचे स्पष्ट झाले.लोकांना संशय आला आणि त्यांनी चौकशी केली असता त्यांच्या खात्यांत पैसेच जमा झाले नसल्याचे सांगण्यात आले. नलिनी यांनी पोलिसात तक्रार केली. त्यानंतर इतरही लोक तक्रारीसाठी येऊ लागले. त्यामुळे खातेदारांमध्ये खळबळ उडाली. त्यांनी पोलीस स्टेशन हिंगणा येथे तक्रार केली. शेकडो गुंतवणूकदारांची त्याने फसवणूक केली होती.चिंतीत गुंतवणूकदारांनी जुलै महिन्याच्या सुरुवातीला हिंगणा पोलीस ठाणे गाठले होते. मात्र, खंगार बेपत्ताच होता. या प्रकरणात अखेर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. नलिनी पुरुषोत्तम तांबूलकर (५२) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी प्रदीप व त्याची पत्नी वंदना खंगार (४८) याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ४०६, ४०९, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ तसेच महाराष्ट्र ठेवीदारांचे हित संबंधाचे संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

फसवणुकीची रक्कम १० कोटींच्या पुढे : सद्यस्थितीत दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात फसवणुकीचा आकडा २.२५ कोटी इतका आहे. मात्र, हा आकडा १० कोटींहून अधिक आहे. खंगार अद्याप फरार असून, त्याचा शोध सुरू आहे. खंगारकडे पैसे सोपविणारे अनेक ठेवीदार हे गरीब किंवा निम्न मध्यमवर्गीय कुटुंबातील आहे. मुलांच्या भविष्यासाठी लोकांनी पोस्टात बचत होईल, या विचारातून खंगारवर विश्वास टाकला होता. मात्र, त्याने विश्वासघात केला. आपले पैसे कधी परत मिळणार, हा प्रश्न घेऊन ठेवीदार पोलीस ठाण्याच्या चकरा मारत आहेत.

पान सहा वरून

ट्रान्सपोर्ट रोडमुळे उड्डाणपूल....

करणारी जड वाहने अंबाजोगाईकडे जातात किंवा परभणी रोड बीड रोड या रोडवर ही वाहतूक मोठ्या प्रमाणावर आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क केला असता त्यांच्याकडून अपेक्षित उत्तर मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत त्यामुळे जाणून बुजून दुर्लक्ष करणारे मुख्याधिकारी यांना सामान्य जनता माफ करणार नाही. या प्रकरणी परळीचे तहसीलदार तसेच नायब तहसीलदार श्री. रुपनर साहेब यांच्याकडे पाठपुरावा केला आहे तरी या गंभीर विषयाची त्यांनी दखल घ्यावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

महिला मोबाईल चोर...

सोबत आणखी कोण कोण आहे ? तिला विचारले असता तिने सुरुवातीला कांहि सांगितले नाही परंतु पोलिस ठाण्यात नेईल असे सांगताच त्या महिलेने माझ्यासोबत आणखी ३ महिला आहेत असे सांगितले व त्या महिला केज बसस्टॅन्ड जवळ बसुन आहेत असे सांगताच बसस्टॅन्ड जवळ गेल्यानंतर त्या महिलांच्या पिशवीमध्ये दोन मोबाईल आढळून आले. त्या मधील एक महिलाने पलायन केले तर तीन महिलाना केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या जरी तीन महिला पकडल्या असल्या तरी यांचे मोठे रॅकेट कार्यान्वीत असण्याचे जनतेमध्ये तर्क वितर्क लावले जात असुन केज पोलिस ठाण्यामधील प्रशासन कारवाई करणार का ? मोबाईल चोरांचे रॅक्ट उघडकीस येणार का ? मोबाईल चोरावर कारवाई होणार का ? आदि प्रश्न केज शहरातील जनतेमध्ये पडले आहेत.

..म्हणून घेतला उपोषण...

काठीचा आधार म्हणून प्रत्येक आई आपल्या मुलाकडे आशाळभूत नजरेने पाहत असते मात्र ताराबाईचा मुलगा त्यांचा कर्दनकाळ बनल्याने त्यांनी पोलिसाकडे अनेक वेळा मुलाच्या बद्दल तक्रारी दिल्या मात्र पोलीस मुलावर कोणतीच कारवाई करत नसल्याचा आरोप त्या करत असून आपल्या पोटच्या मुलापासून आपल्या जीवितास धोका निर्माण झाल्याने प्रशासनाने मुलावर कायदेशीर कार्यवाही करून आपल्याला संरक्षण द्यावे या एकमेव मागणीसाठी ८० वर्ष वयाच्या ताराबाईला उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसावे लागत आहे प्रशासनाकडून न्याय मिळेल अशी अपेक्षा तुम्हाला वाटते का? या प्रश्नावर त्या अभागी आईचे डोळे पाण्याने डब डब भरून आले होते

इनामी जमीनीची बेकायदेशीर...

५६३, ५६०, ६३२, ६२४, ५९९, ३.५.३५३,५४२,५५६,४४३,५०.५४४,५५६,४४६,५४७,५५९,५७४,५६७,५६८,५९२,१७३,१७४,१७५,१७६,५६१,२७.२३९,३६९,२४९,५६६,६१०,२४०,२४९,४०५,२८.२९ प्रमाणे आहेत. या मधिल सर्वे नं.३६९ ही जमीन शासनाने तात्काळ ताब्यात घ्यावी. या प्रकरणावर पडदा टाकण्याचे काम आपल्या कार्यालयातील श्री जवादे व खळगे मॅडम करत असून माहिती देण्यास सतत टाळाटाळ करत असतात असेही निवेदनात नमूद केले आहे.

या अगोदरही याच प्रकरणात तीन वेळेस चौकशी समितीची नेमणूक केली होती व तिन्ही वेळा हा प्रकार अर्थपूर्ण दडपण्यात आला असून सदरील प्रकरण मा. उपविभागीय अधिकारी यांनी जायमोक्यावर जाऊन स्वतः पाहणी करून आपल्याकडे असलेले ईनामी जमीनीचे विलंब माफ करून मालकीत देवस्थान घेण्यात यावे तसेच धारूर तालुक्यातील इनामी जमीनीचे आत्ता पर्यंत झालेले सर्व फेरफार रद्द करण्यात यावे व या प्रकरणातील दोषी अधिकारी व कर्मचारी यांना निलंबीत करून योग्य ती कारवाई करण्यात यावी अन्यथा आपल्या कार्यालया समोर अमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा जेष्ठ नेते तथा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलिम बापु यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

तलाठी सज्जा पुनर्रचना...

शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. तसेच लक्ष्मीआई तांडा गावाचे स्वतंत्र अभिलेखे तयार करणे आणि महाजनवाडी येथे तलाठी सज्जा नवनिर्मितीसाठी आ.क्षीरसागर यांनी महसूल विभागाचे प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांच्याकडेही पत्रव्यवहार केला आहे.

आता उपोषणातून...

नामदेव महाराज तीर्थक्षेत्राचे काम करु असे लेखी आश्वासना नंतर उपोषणाला स्थगिती देण्यात आली परंतू उपोषणाला स्थगिती देऊन ऐक महीना उलटुन सुध्दा काम सुरू केले नसल्याने परत रोहन गलांडे पाटील यांनी आज अमर उपोषण सुरू केले आहे जो पर्यंत कामाला प्रेत्येशात कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार आहे असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मुंडे यांनी लेखी आश्वासन देऊन श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला सुरुवात केली नाही तरी यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण.

संत सावता महाराज...

सावता महाराज यांच्या सप्ताहाची सांगता होईल तरी श्री संत सावता महाराज सप्ताहाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन चिंचोली माळी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

बीड शिवसैनिकांनी ...

जगताप यांनाच संधी द्यावी, याकरिता बीड जिल्हा महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्या तथा बीड मतदार संघातील शिवसेना पदाधिकारी मुंबई येथे मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या भेटीला जाणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सविता किंवांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडलेल्या शिवसेना महिला आघाडी जिल्हा बैठकीत जिल्हाप्रमुख रत्नमाला आंधळे, सहसंपर्कप्रमुख सुमन गोरे, सचिव शकुंतला गोगाशे, पाटोदा तालुकाप्रमुख मनीषा रामपुरे, गेवराई तालुकाप्रमुख गंगा खेवणे, गेवराई सर्कल शितल पुंड्रे, बीड तालुका प्रमुख मंगल गायकवाड, उप तालुकाप्रमुख वैशाली घोंगडे, शहर प्रमुख सुरेखा परसे, उपशहर प्रमुख ऊज्वला खरात, उपतालुकाप्रमुख गेवराई मनीषा जाधव आणि उप सर्कल गेवराई सुरेखा पोहे यांची उपस्थिती होती. याबरोबरच शिवसेना शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी बीड शहर पदाधिकाऱ्यांच्या घेतलेल्या बैठकीत शिवसेना जिल्हा संघटक सुनील सुरवसे , हनुमानप्रसाद पांडे, नवनाथ शिंदे, आकाश वाघमारे, आबासाहेब जाधव, अनिकेत नाटकर व आदी पदाधिकारी उपस्थित होते.

विषमता जाळण्यासाठी आझाद...

बळी थोरात, सुरेश थोरात, सुरेश पिसुळे, उमेश थोरात, राहुल थोरात, विशाल थोरात लक्ष्मण थोरात, विलास थोरात, भारत गायकवाड, नवनाथ लोंढे ,अमोल पिसुळे, अर्जुन थोरात परमेश्वर थोरात बंडू थोरात राजेश शेवाळे मदन थोरात रोहिदास शेवाळे अजय थोरात कृष्ण थोरात करण थोरात आदिने परिश्रम घेतले

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्र प्रतिक्षेत

डॉ.गणेश ढवळे

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना निवेदन

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथील सर्व सोयींनी युक्त प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य ईमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्च करण्यात आला असुन २ वर्षांपूर्वी बांधकाम पूर्ण झालेले आहे.

मात्र शासनाच्या लालफितीत आणि कंत्राटी कर्मचारी यांच्या अनागोंदी कारभारामुळे आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतिक्षेत असुन शासनाच्या लालफितीच्या कारभारात प्रत्यक्ष आरोग्य सेवा अडकून पडली आहे.कुसळंब परीसरातील गोरगरीबांना आरोग्य सेवेपासुन वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे पाटोदा तालुक्यातील दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक प्राथमिक आरोग्य केंद्र तातडीने सुरू करण्यात यावे अन्यथा १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे आणि शेख युनुस च-हाटकर यांना दिले आहे.

शासन पातळीवर प्रयत्न सुरू

कुसळंब आणि दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. शासनातर्फे भरल्या जाणाऱ्या वैद्यकिय अधिकारी आणि आरोग्य सहाय्यकांची दोन पदे भरलेली आहेत.क्लार्क, एएनएम,, सफाई कामगार अशा स्वरुपाचा कर्मचारी वर्ग बाह्य स्त्रोताकडुन घ्यावयाचा आहे. हा कर्मचारी वर्ग भरण्यासाठी वरीष्ठ पातळीवरून प्रयत्न सुरू आहेत.

आरोग्य केंद्रासाठी मोलाचे योगदान

कुसळंबचे भुमिपुत्र डॉ.राधाकृष्ण पवार हे बीड जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी वाहली येथे मोडकळीस आलेले प्राथमिक आरोग्य केंद्र कुसळंब येथे स्थलांतरित करण्यासाठी प्रयत्न केला.वाहली आणि परीसरातील लोकांनी यास विरोध केला प्रकरण अगदी न्यायालयापर्यंत गेले. त्यानंतर डॉ.पवार यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लाऊन कुसळंब येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करून घेतले.आणि केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून त्यांनी त्यासाठी ६ कोटी ३१ लाख रुपयांचा निधी खेचून आणला. डॉ.पवार यांचे कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यात मोलाचे योगदान आहे.

ब्लड स्टोरेजच्या माध्यमातून निश्चित फायदा

डॉ.ओमप्रकाश शेटे: तिरुपती ब्लड स्टोरेज सेंटरचा शुभारंभ

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई शहरात नव्याने रक्तदानाच्या माध्यमातून जीवनदान मिळण्यासाठी प्रथमच तिरुपती ब्लड स्टोरेज सेंटर चा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. डॉ. ओमप्रकाश शेटे,आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती महाराष्ट्र राज्य मुंबई, यांच्या हस्ते थाटामाटात शुभारंभ संपन्न झाला.

या बाबत अधिक माहिती अशी की, या शुभारंभ सोहळ्यास प्रमुख उपस्थिती म्हणून महंत दिलीप बाबा घोगे, ह.भ.प. दत्ता म गिरी, ह.भ.प.नामदेव महाराज, माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित युवा नेते शिवराज दादा पवार, यांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न झाला तिरुपती ब्लड सेंटरचे संचालक डॉ. गोविंद लेंडगुळे, डॉ. गायत्री पाटील लेंडगुळे, माध्यमातून ग्रामीण भागातील रुग्णांना तात्काळ सेवा उपलब्ध मिळतील रूग्णांना बीड येथे जाऊन ब्लड घेऊन येण्याची कसरत करावी लागत होती मात्र आता गेवराई शहारात सुविधा उपलब्ध झाली आहे. या शुभारंभ प्रसंगी बोलतांना डॉ. ओमप्रकाश शेट्टे म्हणाले की, आपल्या देशात अनेक राज्य, खंड आहेत प्रत्येक भागात वेगवेगळी जाती – धर्म , प्रथा परंपरा असून मात्र पाकिस्तान असो की भारत यात रक्त सर्वांचेच एकच आहे त्यामुळे रक्तदान करून रुग्णांना मदत केली पाहिजे शेवटी आपल्या सर्वांची माणूसकी हीच जात व मानवता हाच धर्म हे मानणारा पैकी मी एक आहे. या उद्घाटनप्रसंगी संजीवनी हास्पीटलचे संचालक डॉ संजय बाहेती, डॉ विजय सिकची, गेवराई तालुका डॉक्टर ओशियन. पत्रकार आल्ताफ कुरेशी, ,ईश्वर पवार, सचीन वावरे, रमेश आठवले सर्व डॉक्टर ,व नागरीक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

सत्कार...

बीड : पूर्णवादी नागरी सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी डॉ.सुभाष जोशींची निवड करण्यात आली.त्यानिमित्ताने राजेंद्र मस्के यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी डॉ. पालवणकर, श्रीराम बहीर,नवनाथ शिराळे, बालाजी पवार, बद्रीनाथ जटाळ, चंद्रसेन नवले, शरद बडगे आदि.

आष्टी मतदार संघाच्या लागले तयारीला!

पडघम : आम आदमी पार्टीचा झाला निर्णय

आष्टी /पुण्यभूमी प्रतिनिधी

येणार्या विधानसभा निवडणुकीमध्ये आम आदमी पार्टीतर्फे जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदारसंघ असलेला आष्टी–पाटोदा–शिरुरच्या विधानसभेतून आस्मान जरांगे पाटील निवडणुक लढवणार असल्याची माहिती पक्षाचे शहराध्यक्ष विष्णुपंत गिरी, दहिवंडीचे सर्कलप्रमुख नारायण आघाव, दहिवंडीचे शाखा प्रमुख संजय आघाव, कोळवाडीचे शाखाप्रमुख अंबु जाधव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे शिक्षण, आरोग्य, रोजगार आदी कामे पाहता देशामध्ये आम आदमी पार्टीची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असून आम आदमी पार्टी हा पक्ष भ्रष्टाचारमुक्त राजकारण करत आहे त्यामुळे पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा हा अल्पावधीतच प्राप्त झाला आहे. अशातच महाराष्ट्र राज्यात राजकारणात बावळटगिरी, आमदार–खासदार विकत घेणे, पक्षफोडीची वृत्ती विकास कामात टक्केवारी खाणे यामुळे महाराष्ट्रातील राजकारण कीडयुक्त झाले आहे. त्यामुळे लागलेली कीड संपुष्टात आणण्यासाठी व शेतकर्यांचे, सुशिक्षित बेकारांचे, महीलांचे, कंत्राटी नौकर वर्गीयांचे कामे करण्यासाठी आम आदमी पार्टी राज्यातील सर्व २८८ विधानसभा लढवणार आहे असेही पत्रकाद्वारे आम आदमी पार्टीकडून कळविण्यात आले आहे.

देवगिरी प्रतिष्ठानकडून वकृत्व स्पर्धा

प्रा.प्रदिप रोडे : स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी देवगिरी प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय शालेय/आंतर महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.११ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता सदरील स्पर्धा तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे आयोजित करण्यात आली असून या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत युवक, युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठान बीड संस्थापक अध्यक्ष तथा स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा.प्रदीप रोडे यांनी केले आहे.

साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त देवगिरी प्रतिष्ठान बीड दरवर्षी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धे चे आयोजन करते. सदरील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा यावर्षी १५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची कर्तृत्वाची चर्चा व्हावी आणि महापुरुषांच्या आदर्शाची परंपरा भावी पिढीसमोर यावी म्हणून देवगिरी प्रतिष्ठान बीड दरवर्षी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करते. यावर्षी वरिष्ठ गटासाठी स्पर्धेचे विषय १)अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातुन आलेला मानवतावाद.२) फुले,शाहू,आंबेडकरी चळवळीचे वर्तमान. हे विषय असून कनिष्ठ गटासाठी १) जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव. २) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊ साठे यांचे योगदान. हे विषय आहेत. या स्पर्धेत वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक रोख रक्कम सात हजार रुपये,स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र असे आहे. उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये रोख रक्कम, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र तर कनिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम तीन हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर तृतीय पारितोषिक दोन हजार रुपये, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र असे आहे. उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये रोख रक्कम, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड, तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथे नाव नोंदणी करावी आणि युवक, युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष तथा स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे.

नगर रोडच्या कामास येणार वेग

तत्परता : शिवसंग्रामने आंदोलनाचा इशारा देताच प्रशासन जागे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहरातून जात असलेल्या परळी अहमदनगर राष्ट्रीय महामार्गाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यापार्श्वभूमीवर शहर शिवसंग्रामच्या वतीने दी. २३ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले होते. काम जलद गतीने पूर्ण करा अन्यथा शिवसंग्राम तीव्र आंदोलन करेल असा इशारा या निवेदनात देण्यात आला होता. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना सूचना देत येत्या दोन दिवसात या महामार्गाच्या कामाला वेग येईल अशी माहिती दिली आहे.

बीड शहरातीळ प्रमुख रस्ता आणि विविध शासकीय कार्यालये असलेल्या नगर रस्त्यावर सध्या काम चालू आहे. रस्त्याची एक बाजू खोदण्यात आली आहे.दुसऱ्या बाजूला अरुंद सर्विस रोड खुला केला आहे. महामार्गाचे काम अत्यंत संथगतीने होत असल्यामुळे रस्त्यावर सर्वत्र चिखल,खड्डे आणि पाऊस थांबताच धूळ असे चित्र पाहायला मिळते. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होत आहे . त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही . या महामार्गाचे काम गतीने व्हावे यासाठी शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योती मेटे यांनी पाठपुरावा केला होता. तर बीड शहर शिवसंग्रामच्या वतीने काम पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना सूचना देऊन महामार्गाचे काम संथ गतीने सुरु असल्याने येत असलेल्या अडचणींबद्दल शिवसंग्रामच्या निवेदनाची दखल घेत संबंधित अधिकाऱ्याची तातडीची बैठक बोलावत या कामाला गती देण्याचे निर्देश दिले आणि लवकरच महामार्गाच्या कामांमुळे होत असलेल्या अडचणींमधून बीडकरांची सुटका होईल असा विश्वास जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी व्यक्त केला .

अजिजपुरा भागातील मुस्लिम युवकांचा प्रवेश

पक्षांतर : जयदत्त क्षीरसागर गटात दाखल

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी काळात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागरांचे नेतृत्व सर्वमान्य असून त्यांच्या नेतृत्वाखालीच काम करण्याची तयारी दाखवत शेकडो युवक सामील होऊ लागले आहेत. मंगळवार दि.२४ रोजी अजिजपुरा भागातील शेकडो युवकांनी जाहीर प्रवेश केला आहे.

माजी नगरसेवक मुखीद लाला यांच्या पुढाकाराने आजीजपुरा भागातील शेख रईस, शेख अजहर, जहागीरदार शाकेर, समीर इनामदार, शेख शाहेद, नसिर कुरेशी, शेख अनीस यांनी शेकडो युवकांसह माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेतली. यावेळी हिवरापहाडीचे माजी सरपंच शेख नसीर हे ही उपस्थित होते. बीड शहरात आणि ग्रामीण भागात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना मोठा प्रतिसाद मिळत असून पुढील भविष्य लक्षात घेऊन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे पुन्हा एकदा हात बळकट करण्यासाठी शेकडो तरुणांचा प्रवेश होऊ लागला आहे. उपस्थित प्रमुख तरुणांसह कार्यकर्त्यांचे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी स्वागत केले.यावेळी शेख शोयब, शेख कामरान, शेख तरबेज, फिरोज इनामदार, शेख अकबर, शेख निहाल, शेख अरबाज, शेख इलियास, शेख उमर, शेख अनारस, पठाण आरेफ आदींची उपस्थिती होती.

राजेंद्र मस्के

झेडपी प्रशासनाला दिले पत्र

शिक्षक पदोन्नतीचा निर्णय तातडीने घ्यावा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत शिक्षक पदोन्नतीचा निर्णय दरवर्षी जूनपूर्वी घेतला जातो. परंतु बऱ्याच दिवसापासून शिक्षक पदोन्नतीचा निर्णय प्रलंबित आहे. जून व जुलै अखेर सेवा निवृत्त होणाऱ्या शिक्षक व कर्मचार्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. शाळा सुरु होण्यापूर्वी पदोन्नतीचा निर्णय झाला तर, आवश्यक तेथे शिक्षकांची नेमणूक देऊन विद्यार्थ्यांची गैरसोय टाळता येते. पदोन्नतीचा निर्णय न झाल्यामुळे आज अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची गैरसोय आढळून येते.

यामुळे विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान टाळता येत नाही. शिक्षण व्यवस्थापनाला महत्व देऊन, जिल्हा परिषद प्रशासनाने शिक्षक विभागातील पदोन्नती बाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केली आहे.

केंद्रप्रमुख, शि.वि.अ., ग्रेड मुख्याध्यापक (प्रा), प्राथमिक पदवीधर यांच्या पदोन्नती प्रचलित शासकीय नियमानुसार करण्यात याव्यात, सर्व प्रवर्गाच्या पदोन्नत्या समुपदेशनाद्वारे कराव्यात,प्रचलित नियमानुसार केंद्रप्रमुख सेवाजेष्ठता अंतिम यादी प्रकाशित करण्यात यावी, वरिष्ठ वेतन श्रेणी व निवड श्रेणी प्रलंबित प्रस्तावांना ३०/०७/२०२४ पुर्वी मंजुरी मिळावी व वैद्यकिय प्रतिपुर्ती देयके मंजूर करावीत तसेच दरमहा महिना अखेरीस नियमितपणे वैद्यकिय प्रतिपुर्ती मंजूरी समितीच्या बैठका घेण्यात याव्यात या मागण्यासाठी आज पदोन्नती संघर्ष समिती व विविध संघटनेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्या कार्यालयासमोर शिक्षकांनी आमरण उपोषण सुरु केले आहे.

यादरम्यान भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी उपोषणकर्त्या शिक्षकांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तरपणे चर्चा करून त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या. शिक्षकांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा असे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांना दिले.

धर्म परंपरेनुसार गायत्री महायज्ञ

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गायत्री तीर्थ शांती कुंज हरिद्वार हिंदू धर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार प्रदूषण नष्ट करण्यासाठी तसेच व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत् प्रेरणा जगविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुहिक यज्ञ कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ट वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य हरिद्वार यांच्या प्रेरणेने दिनांक २४/०७/२०२४ आषाढ वद्य संकष्ट चतुर्थी निमित्त गायत्री महायज्ञ आयोजित केला होता .

या गायत्री यज्ञाचे यजमान पद मुकुंद भुतपल्ले हे सहपरिवार हजर होते .

सकाळी श्री सिद्धिविनायक गणपती महापूजा यजमान भुतपल्ले व श्री तुकारामजी जोशी यांच्या हस्ते संपन्न झाली. व नंतर गायत्री यज्ञाला सुरुवात झाली या. प्रसंगी ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे हे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाला यजमान श्री व सौ भूतपल्ले ,विलास लेंबे ,वाल्मीक चाटे ,रत्नपारखी काका श्रीमती पोकळे काकू, श्री भरावे, मेहेत्रे, जाधव,हिंदोळे ,चंपावती पत्र चे महादेव साळुंके तसेच यशवंत नगर मधील रहिवासी मोठ्या संख्येने सामूहिक हवन करण्यासाठी उपस्थित होते.

सुविचार - प्रत्येक आव्हान हे नवीन शिकण्याची आणि विकासाची संधी आहे.

निराशाच अधिक....!

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प सादर केला. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला स्वबळावर सरकार स्थापन करता आले नाही. त्यांना मित्रपक्षांच्या मदतीची गरज लागली. त्यामुळे हा अर्थसंकल्प आधीच्या तुलनेत अधिक सर्वसमावेशक असेल, असे वाटत होते. अर्थात आघाडी किंवा युतीचे सरकार असते तेव्हा सगळ्यांना सांभाळून घेणारा अर्थसंकल्प सादर करणे हे एक मोठे आव्हानच असते, ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तरी सगळ्याच घटकांना न्याय देण्यात अर्थमंत्री अपयशी ठरल्या असेच म्हणावे लागेल. काही चांगल्या योजनांची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. नोकरदार वर्गाला दिलासा देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आयकराच्या टप्प्यांमध्ये झालेले बदल तिसऱ्या-चौथ्या दर्जाच्या कर्मचाऱ्यांसाठी नक्कीच दिलासादायक आहेत; परंतु एकूण अर्थसंकल्पाचा विचार केला तर संधी असूनही सीतारामन फार काही चांगले बदल करू शकल्या नाहीत असेच म्हणावे लागेल. भारतात सध्या बेरोजगारी ही एक खूप मोठी समस्या आहे. भलेही भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने विकसित होत असेल; परंतु त्या प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत, ही बाब नाकारण्यात अर्थ नाही. या पृष्ठभूमीवर अर्थमंत्र्यांकडून बेरोजगारी कमी करण्यासाठी काही ठोस उपाय केले जातील, ही अपेक्षा होती; परंतु त्यासंदर्भात अर्थमंत्र्यांनी फारच जुजबी उपाययोजना केल्याचे दिसते. रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी काही प्रोत्साहनपर योजनांची घोषणा करण्यात आली असली तरी देशातील बेरोजगारीचे प्रमाण आणि या योजनांची मर्यादा पाहता किमान येत्या आर्थिक वर्षात तरी बेरोजगारीचे प्रमाण आणि बेरोजगारीची तीव्रता कमी होण्याची शक्यता दिसत नाही. शेतकरी वर्गालाही या अर्थसंकल्पाकडून मोठी आशा होती. शेतकऱ्यांची मुख्य समस्या त्यांच्या उत्पन्नात होत नसलेली वाढ हीच आहे. शिवाय अलीकडील काळात शेतीक्षेत्र किंवा शेती व्यवसाय अतिशय बेभरवशाचा झाला आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना किमान हमी भावाच्या बाबतीत काहीतरी दिलासादायक या अर्थसंकल्पातून मिळेल, असे वाटत होते; परंतु अर्थमंत्र्यांनी त्या बाबतीत तरी शेतकऱ्यांना निराश केल्याचे दिसते. अर्थात शेतीक्षेत्रासाठी १.५२ लाख कोटींची तरतूद अर्थमंत्र्यांनी केली आहे, त्यातून काही नावीन्यपूर्ण योजना राबविल्या जाणार आहेत; परंतु शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत त्यापैकी किती पोहचतात आणि पोहचल्या तरी शेतकऱ्यांना त्यातून प्रत्यक्ष लाभ किती मिळेल, याबाबत सध्या तरी काहीही सांगता येणार नाही, अशीच परिस्थिती आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधीमध्ये वाढ होईल ही अपेक्षाही फोल ठरली. शेअर बाजारालाही या अर्थसंकल्पातून दिलासा मिळाल्याचे दिसत नाही. कॅपिटल गेन टॅक्स अधिक सुटसुटीत आणि व्यावहारिक केला जाईल ही अपेक्षा शेअर बाजाराकडून व्यक्त केली जात होती; परंतु या अपेक्षेला जोरदार धक्का देत अर्थमंत्र्यांनी कॅपिटल गेन टॅक्सप्रमाणेच लाँग टर्म कॅपिटल गेन अडीच टक्क्यांवरून थेट १२ टक्क्यांवर नेला. काही निवडक ॲसेटस्‌वर शॉर्ट टर्म कॅपिटल गेन टॅक्स वीस टक्क्यांनी वाढविला. अर्थमंत्र्यांच्या या घोषणेनंतर लगेच शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली. आता रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प नसतो, सर्वसाधारण अर्थसंकल्पातच रेल्वेसाठी तरतूद केली जाते. गेल्या काही महिन्यांमध्ये झालेल्या रेल्वे अपघाताने रेल्वेच्या पायाभूत सुविधांमधील दोष ठळकपणे समोर आले, त्या पृष्ठभूमीवर रेल्वेला पायाभूत सुविधा अधिक मजबूत आणि आधुनिक करण्यासाठी बऱ्यापैकी निधी उपलब्ध करून दिला जाईल, ही अपेक्षा होती; परंतु रेल्वेच्या पायाभूत सुविधांबद्दल अर्थमंत्री काहीच बोलल्या नाहीत, वंदे भारत, अमृत भारत आणि बुलेट ट्रेन बाबत कोणतीही नवी घोषणा झाली नाही. या काही गोष्टींचा विचार केला तर हा अर्थसंकल्प अगदीच साधारण म्हणावा असा ठरला. केंद्रातले भाजप सरकार ज्या दोन टेकूंवर उभे आहे, त्या टेकूंना मात्र अर्थमंत्र्यांनी मोठा आर्थिक आधार दिला आहे. वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार आता कोणत्याही राज्याला विशेष राज्याचा दर्जा देता येत नसला तरी आंध्र प्रदेश आणि बिहार या दोन्ही राज्यांना प्रचंड खर्चाच्या पायाभूत विकास योजनांची भेट अर्थमंत्र्यांनी दिली आहे. अर्थात हे अपेक्षितच होते; परंतु भारत नामक संघराज्यात इतरही अनेक राज्ये आहेत आणि त्यापैकी अनेक राज्ये आर्थिकदृष्ट्या अगदीच बिमारू गटात मोडणारी आहेत, याचे भान ठेवून थोडा दौलतजादा या राज्यांवरही झाला असता तर किमान झालेला पक्षपात इतका ठसठशीतपणे समोर आला नसता. थोडक्यात काही चांगल्या घोषणा, काही चांगल्या तरतुदी असल्या तरी सरासरी विचार करता हा अर्थसंकल्प देशवासियांची निराशा करणारा आहे, असेच म्हणावे लागेल.

महाराष्ट्राची उपेक्षाच....!

केंद्रातले मोदी सरकार सहकारी पक्षाच्या पाठिंब्यावर उभे आहे. यावेळी भाजपला स्वबळावर बहुमताचा आकडा गाठता आला नाही, त्यामुळे रालोआतील सहभागी घटक पक्षांना सांभाळण्याची कसरत भाजपला करावी लागत आहे. सत्ता स्थापनेसाठी भाजपला दिलेल्या बिनशर्त पाठिंब्याची काही ना काही किंमत हे प्रादेशिक पक्ष वसूल करतील, ही अपेक्षा होतीच. विशेषतः मंत्रिमंडळ गठन करताना, लोकसभा अध्यक्षाची निवड करताना या घटक पक्षांनी भाजपची कुठेही अडवणूक केली नव्हती, त्यामुळे अर्थसंकल्पात या सहकाऱ्यांना खूश केले जाणे अपेक्षितच होते. त्यातही काही सहकारी अगदी खास आहेत, कारण त्यांनी टेकू काढला तर अगदी दुसऱ्याच क्षणी मोदी सरकार अल्पमतात येते. त्यामुळे या खास सहकाऱ्यांवर खास मेहेरनजर होणार होतीच आणि ती तशी झाली देखील. चंद्राबाबूंच्या आंध्र प्रदेशला आणि नितीशबाबूंच्या बिहारला अर्थमंत्र्यांनी अगदी छप्पर फाड के दान दिले आहे; परंतु बिहार, आंध्र प्रदेशवर ही खैरात करताना रालोआमधील चौथा सगळ्यात मोठा पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या महाराष्ट्राची मात्र अगदीच तुटपुंज्या मदतीवर बोळवणूक करण्यात आली. महाराष्ट्रात एकट्या शिंदे गटाची सत्ता नाही तर भाजपदेखील सत्तेत सहभागी आहे, अजित पवारांचा गटदेखील सत्तेत सामील आहे आणि विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीतील निराशाजनक कामगिरीनंतर आता लगेच होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आपली पत सांभाळण्याचे, आपली प्रतिष्ठा पूर्ववत करण्याचे आव्हान भाजपसमोर आहे. त्यामुळे किमान विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन तरी महाराष्ट्राला काही खास योजनांची भेट मिळेल असे वाटत होते; परंतु अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या दीड तासांच्या अर्थसंकल्पीय भाषणात महाराष्ट्राचा साधा उल्लेखही झाला नाही. राज्यासाठी कोणत्याही नवीन प्रकल्पाची घोषणा झाली नाही. मराठवाड्यातील पाणी प्रकल्पाकरिता वाढीव निधीची तरतूद केली जाईल, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती, मुंबईतील वित्तीय केंद्राबाबत काही ठोस आश्वासन मिळेल अशी अपेक्षा होती; परंतु महाराष्ट्राच्या पदरी यातले काहीच पडले नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यासारख्या दादा नेत्यांनाही अर्थमंत्र्यांवर कोणताही दबाव निर्माण करता आला नाही. खरे तर देशात सर्वाधिक कर महाराष्ट्रातून वसूल होतो; परंतु सर्वाधिक उपेक्षा महाराष्ट्राच्याच वाट्याला आली.

कटाक्ष

जयंत माईणकर
9821917163

मनमानी नोकरशहांची!

वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर आणि त्यांच्या परिवाराच्या कारनाम्याने राजकारण्यांच्या तथाकथित भ्रष्टाचाराच्या चर्चेपेक्षा नोकरशहांच्या तथाकथित भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर येऊ लागली आणि या चर्चेला एक वेगळेच वळण लागले. आणि मला १९८८ साली देशभर गाजलेली घटना आठवली. चंदीगड येथे आयोजित केलेल्या नोकरशहांच्या मद्यधुंद पार्टीत दहशतवाद्यांचे कर्दनकाळ म्हणून गाजलेले के.पी.एस. गिल यांनी आयएएस ऑफिसर रूपम देवल बजाज यांच्या पार्श्वभागावर एक चापट मारली. रूपम देवल बजाज यांनी पोलिसात तक्रार केली. १९८८ साली घडलेल्या या घटनेचा निकाल २००५ साली लागला आणि गिल यांना दोषी ठरवून त्यांना दोन लाख रुपये दंडाची शिक्षा झाली. याच गिल यांना गुजरात दंगलीनंतर तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी केंद्र सरकारचे दूत म्हणून पाठवले. त्यांच्या शिफारसीनुसार पुढे गुजरातमधून लष्कर माघारी बोलावण्यात आले. या काळात दोन वेळा गिल यांच्याशी व्यक्तिगत भेटीचा योग आला होता. एकदा त्यांनी एका पार्टीतही बोलावलं होतं.

नोकरशहांच्या हातून अशा प्रकारचे गुन्हे घडण्याच्या अनेक घटना दाखवता येतील. अगदी खून, बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांतसुद्धा या नोकरशहांचा समावेश असतो. नोकरशहांच्या हातात अनिर्बंध सत्ता असते किमान तीस ते पस्तीस वर्षे! राजकारण्यांना दर पाच वर्षांनी आपली खुर्ची शाबूत ठेवण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी पैसाही खर्च करावा लागतो. त्यात कधी कधी अपयशही येऊ शकते; पण नोकरशहांना तसा कुठलाच अडथळा नसतो. शिवाय निवृत्तीनंतर निवृत्तीवेतनाच्या बरोबरच एखाद्या समितीचे किंवा आयोगाचे अध्यक्ष पद! त्यामुळे मरेपर्यंत अनिर्बंध सत्ता हाती राहते. आणि म्हणूनच की काय UPSC परीक्षेत आपण तरून जावे आणि अनिर्बंध सत्ता आपल्या हातात राहावी यासाठी वाट्टेल ते करण्याची प्रसंगी बेकायदेशीर कृत्य करण्याची प्रवृत्ती वाढते. नोकरशहांच्यापेक्षा जास्त पगार खासगी क्षेत्रात मिळतो, असे सांगितले जाते; पण नोकरशहांना मिळणाऱ्या बंगला, गाडी, नोकर- चाकर इत्यादी सुविधा आणि हातात असलेले अनिर्बंध अधिकार आणि त्या अधिकाराचा वापर करताना होणारे फायदे, मिळणारा काळा पैसा याचे आकर्षण इतके असते, की त्यामुळे UPSC कॅडर मध्ये जाण्यासाठी जात, वय, अपंगत्व यांसारख्या कुठल्याही गोष्टींचा गैरवापर करण्याची तयारी असते. हाच प्रकार पूजा खेडकर यांच्या बाबतीत घडला असावा असे वाटते. आणि तसेच इतर ठिकाणचे प्रकारही उलगडत आहेत. त्यात गैरमार्गाने प्रवेश मिळणाऱ्या लोकांबरोबर त्यांना त्या कामी मदत करणारे लोकही तितकेच दोषी आहेत. व्यापम सारखा सुमारे ४० लोकांचा बळी घेणारा वादग्रस्त नोकरी घोटाळा भाजपशासित मध्य प्रदेशातच घडला, ही वस्तुस्थिती आहे.

याच पृष्ठभूमीवर UPSC चे अध्यक्ष मनोज सोनी यांनी तर राजीनामा दिलेला नाही, अशी रास्त शंका येते. मनोज सोनी हे पंतप्रधान मोदींचे निकटवर्तीय मानले जातात. २००५ मध्ये मोदींनीच सोनी यांची वडोदराच्या एमएस युनिव्हर्सिटीच्या कुलगुरूपदी नियुक्ती केली होती, त्यावेळी मनोज सोनी अवघे ४० वर्षांचे होते. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी मनोज सोनी यांच्या UPSC अध्यक्षपदी नियुक्तीवर प्रश्न उपस्थित केला होता. सोनी UPSC चेअरमन झाल्यावर राहुल गांधींनी याला संविधानावरील हल्ला म्हटले आणि सोनी यांना RSS जवळचे म्हटले होते. राहुल गांधी म्हणाले होते की, मनोज सोनींचे अध्यक्ष होणे म्हणजे यूपीएससी केंद्रीय लोकसेवा आयोगाऐवजी संघ प्रचारक संघ आयोग होईल.

UPSC प्रमुखांनी राजीनामा दिला असला तरीही हे प्रकरण आत्ताच आकार घेत आहे.. पुढे काय काय उघड पडेल याचा अंदाज आला असेल म्हणून तर सोनी यांनी राजीनामा दिला नसेल ना? मागे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या मुलीला थेट IAS अधिकारी म्हणून निवड केली होती हे प्रकरण समोर आहेच. अनेक वेळा नोकरशहा, त्यांचे नातेवाईक यांच्या वागणुकीत जुनी सरंजामी पद्धती, सामंतशाही डोकावते. याची सुरुवात केबिनमध्ये येताना may I come in sir, हे विचारलेच पाहिजे इथून सुरू होत ते हातात पाण्याचा ग्लास देण्यापर्यंत असते. आपण कोणीतरी फार मोठे आहोत आणि आपण काहीही केले तरीही आपल्यावर कारवाई होणार नाही, असा माज बाळगत हे नोकरशहा वागतात. या मनोवृत्तीतूनच गुन्हा घडतो. हाताखालच्या लोकांना उद्देशून अपशब्दांचा तर भडिमार सुरूच असतो. हरयाणाचे एसपीएस राठोर हे त्यापैकीच एक! त्यांनी आपल्या मुलीच्या वर्गमैत्रीणीचा रुचिका गिरहोत्रा या मुलीचा विनयभंग केला. त्या प्रकरणात १९ वर्षांनी त्यांना शिक्षा झाली; पण दरम्यान रुचिकानी मात्र आत्महत्या केली. या राठोरना ही केस सुरू असतानाच बढती मिळते हेच भ्रष्ट राजकीय पद्धत दर्शविते. हरयाणाचेच आयपीएस ऑफिसर रविकांत शर्मा यांना तर पत्रकार शिवानी भटनागर यांच्या हत्येसाठी शिक्षा करण्यात आली होती, तर भ्रष्टाचाराचे आरोप झालेल्या बी. के. बन्सल नावाच्या आयएएस ऑफिसरने आपल्या परिवारासह आत्महत्या केली. आत्महत्या करणे म्हणजे एक प्रकारे आपल्यावरील आरोपाची कबुली देणे! ही सर्व उदाहरणे हेच दर्शवितात, की सत्ता हातात आल्यानंतर ती डोक्यात जाते ही वस्तुस्थिती आहे.

नोकरशहा किंवा bureaucracy! ब्रिटिशांनी भारतात सुरू केलेली प्रशासनाची पद्धत. आज ज्याला आपण आयएएस म्हणतो त्यालाच ब्रिटिश काळात Indian civil service (आयसीएस) म्हटले जायचे. लॉर्ड वॉरेन हेस्टिंग आणि लॉर्ड कॉर्नवॉलिस याचे जनक मानले जातात. रवींद्रनाथ टागोरांचे ज्येष्ठ बंधू सत्येंद्रनाथ टागोर पहिले भारतीय आयसीएस, तर नेताजी सुभाषचंद्र बोस हेही आयसीएस होते. आपल्या पदाचा राजीनामा देऊन त्यांनी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. ब्रिटिश काळात या नोकरशहांची जबरदस्त पकड असायची! आजही आहे. अनेक वेळा राजकारण्यांना हे नोकरशहा म्हणजे अडचण वाटते. नोकरशहांची ताकद कमी करण्याचा प्रयत्न इंग्लंडमध्येसुद्धा केला जातो. तोच प्रयत्न भारतातही केला जातो.

नोकरशहांच्या बाबतीत माझे मित्र आणि गुजरातचे माजी मंत्री जयनारायण व्यास यांचे विधान लक्षात ठेवण्यासारखे आहे. ते मला म्हणाले, जयंत, नोकरशहा घोड्यासारखे असतात. घोडेस्वार ठरवतो घोड्यानी कोणत्या वेगात आणि कुठल्या दिशेला जायचे! आणि मी एक घोडेस्वार आहे. अर्थात चुकीच्या मार्गाने नोकरशाहीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करणे हेही राजकारण्यांचे काम आहे. ते आपले काम करतील ही अपेक्षा!

तूर्तास इतकेच!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

भूमिका

प्रमोद शिंदे
9967013336
प्रवक्ता, मुंबई प्रदेश संभाजी ब्रिगेड

भिडेचे किडे अन भाजपाचे राजकारण!

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात जो मोठा दणका भाजपाला पडलाय, त्यातून अण्णाजी पंत व परिवार अजून सावरलेला दिसत नाही. राम मंदिराचा मुद्दा हा काय महाराष्ट्रात चालला नाही, त्यातून तुमची फजिती झालीय कारण हा संपूर्ण महाराष्ट्र, इथला मराठी माणूस छत्रपती शिवराय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ३३ कोटींच्या देवांच्या अगोदर मानतो, हे भूतकाळातही सत्य होते आणि वर्तमानात सत्य आहे, आणि भविष्यातही असणार. आता याची जाणीव झालेल्या व चिंतेत असणाऱ्या अण्णाजी पंतांनी आता विधानसभा निवडणुकी अगोदर छत्रपती शिवरायांचा वापर करायला सुरुवात केलीय, मग हिंदू- मुस्लीम वाद चिघळवून विधानसभा निवडणूक जिंकायची असा डाव साधलाय. यासाठी मुद्दे कोणते तर...

१. गड- किल्ल्यांवरील दर्ग्यांचे अतिक्रमण.

२. अफझल खान वधात वापरलेली वाघ नख भारतात आणणे.

आपण एक एक मुद्दा घेऊ, प्रथम आपण बोलू 'गड किल्ल्यांवरील दर्ग्यांचे अतिक्रमण'. हा मुद्दा योग्य असेल, तर गड किल्ल्यांवर असणारे सर्वच अतिक्रमण काढायला हवे. कारण छत्रपती शिवराय व त्यांचे किल्ले ही महाराष्ट्राची अस्मिता आहेत. त्यामुळे मागील १०० वर्षांत या गड- किल्ल्यांवर असणारे सर्वच अतिक्रमण मग ते कोणत्याही धर्माचे असो काढायला हवेच. मग आता प्रश्न येतो काय काय काढायला हवे तर...

१. सिंहगडावरील बाळ गंगाधर टिळकांनी बांधलेला वाडा..सिंहगड हा नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमाची आठवण करून देणारा किल्ला, यावर टिळकांनी केलेले अतिक्रमण काढावे.

२. अनेक किल्ल्यांवर मागील २० ते २५ वर्षांत अनेक मंदिरे उभी राहिलीत, ते अतिक्रमण नाही का? उदा. सिंधुदुर्ग किल्ला.

३. छत्रपती शिवराय व संभाजी राजे यांची, तसेच स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावर जिथे छत्रपती शिवरायांची समाधी आहे तिथेच शेजारी असणाऱ्या राणी सोयराबाईंच्या समाधीवर बसवलेला वाघ्या कुत्रा (इतिहासात याचा कोठेही पुरावा नाही.) तो काढायला नको का?

४. त्यासमोर मस्जिदीच्या रूपात उभे असलेले रायरेश्वर मंदिर (मस्जिदी प्रमाणे ४ घुमट आहेत. नीट पहावे.) त्यात १५ ते २० वर्षांपूर्वीपर्यंत फक्त शिव लिंग स्वरूपातील रायरेश्वर होते. या मागील काही वर्षांत दगडाला शेंदूर फासून हनुमान बसवलाय, गणेश मूर्ती बसलीय, जी आताच मागील काही वर्षांत बसवली आहे. छत्रपती शिवराय हे फक्त शिवशंकर व भवानी देवीचे पूजक होते. मग हा हनुमान व गणपती का काढू नये?

५. सज्जनगडावर रामदास स्वामी यांची कबर का बरे आहे? हिंदू धर्मात कबर बांधली जात नाही, मग रामदास स्वामी यांची कबर कशी आली? कबरीवर टाकलेला कपडा काढून बघावा, मग कळेल. इतिहासकार मा. म. देशमुख यांच्या मांडणीनुसार १९५० पर्यंत इथे हिरवा कपडा टाकला जायचा. (या मांडणी विरोधात आचार्य अत्रे कोर्टात गेले; परंतु मा. म. देशमुख ही केस जिंकले. मुंबई उच्च न्यायालयात पुराव्यानिशी त्यांनी हे सत्य सिद्ध करून दाखविले. (केस. ९५१/१९६९)

६. अनेक बुद्ध कालीन लेण्यांमध्ये मंदिरे घुसविण्यात आलीत, ती का काढू नयेत.

हे असे अनेक मुद्दे आहेत, त्यात भिडेच्या किड्यांनी घुसावे. आता माझे अनेक मित्र म्हणतील की तू फक्त हिंदूबद्दल बोलतोस, तू हिंदू नाहीस का?

हो मी हिंदू आहे पण, छत्रपती शिवरायांचा, संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर व संत गाडगेबाबांचा हिंदू आहे, जे स्वातंत्र्य, समता व बंधुता शिकवितात. राहिला प्रश्न गड- किल्ल्यांवर जी जी मस्जिदे, मंदिरे किंवा तत्सम इतर धर्मांतील मागील १०० वर्षांत उभी राहिली असतील तर ती काढावीत, राज्य सरकारने यात पुढाकार घ्यावा. विशालगडावरील दर्गा हा शिवपूर्व कालीन आहे, छत्रपती शिवराय व संभाजी राजे यांनी स्वतःच्या हयातीत या दर्ग्याला स्पर्श केला नाही, उलट सांभाळ केला, ते पाडण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला? तसेच प्रतापगडावरील अफझल खान कबरीचा मुद्दा, स्वतः छत्रपती शिवराय यांनी शत्रू कितीही बलाढ्य असला, तरी स्वराज्यावर चालून आलेल्या शत्रूला इथेच गाडले जाते, असा इशारा देताना बांधलेली कबर.... ती पाडण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला?

भिडेचे किडे व अण्णाजी समजून घ्या हा इशारा आहे, महाराष्ट्र एकसंध होता आणि राहणार. तुमचे काळे कृत्य इथे चालणार नाही.

अरे काय काय खोडणार आहात तुम्ही? शाह शरीफ दर्ग्यावरून छत्रपती शिवराय यांचे वडील व काकांचे नाव शाह व शरीफ ठेवले हा इतिहास खोडणार आहात का तुम्ही?

अफझल खानाचे मुंडके छाटणारा इब्राहिम खान हा छत्रपतींचा सेनापती होता हा इतिहास खोडणार, की रत्नागिरीतील केळशीचे याकूत बाबा जिथे छत्रपती शिवराय भेट देत असत व तिथे देणगी देत, हे खोडणार आहात तुम्ही? कोल्हापूरचे संभाजी तुम्ही या सर्व दर्ग्यांना अजूनही भेट देता की नाही, मी सांगितले ते खरे की खोटे सांगणार का? महाराष्ट्राला कळू द्या, या अगोदर या अण्णाजीने तुमचा वापर करून बाजूला केलाय, तरीही अजून परत तीच चूक करताय तुम्ही?

आता दुसरा मुद्दा मुनगंटीवारजी तुम्ही सांगत आहात, की अफझल खान वधाच्या वेळेस वापरलेली वाघनखं महाराष्ट्रात आणताय? मुनगंटीवारजी ही वाघनखं शिवरायांची आहेत हे तितकंच खरं आहे जितकं गेल्या वेळी तुम्ही महाराष्ट्रात ३३ कोटी वृक्ष लावलीत असा दावा केला होता. म्हणजेच सपशेल खोटं आहे. देशातील सगळे इतिहासकार व स्वतः लंडनचे म्युझियमवाले नाकारत आहेत, की त्यांच्याकडे ही वाघनखं शिवरायांची आहेत, असा एकही पुरावा नाही.

मग महाराष्ट्राला का फसवताय? तुमच्या खोटेपणाला एकवेळ भिडेचे किडे फसतील; पण महाराष्ट्र फसणार नाही.

हा छत्रपती शिवराय, संभाजी राजे, फुले- शाहू- आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे, संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, गाडगेबाबा, तुकडोजींचा महाराष्ट्र आहे, इथे तुमची डाळ शिजणार नाही.

डिजिटेक

देवनाथ गंडाटे
7264982465
डिजिटल मीडिया अभ्यासक, नागपूर

इमोजी: भावना व्यक्त करण्याची आधुनिक भाषा

आजच्या डिजिटल युगात, मजकूर आणि शब्दांपेक्षा इमोजीद्वारे संवाद साधणे अधिक लोकप्रिय होत आहे. हे लहान, रंगीबेरंगी चित्र आपल्या भावना आणि कल्पना व्यक्त करण्याचा एक मजेदार आणि गतिमान मार्ग बनले आहेत. सध्याच्या आधुनिक युगात सोशल मीडियाद्वारे आपण एकमेकांशी जोडले गेलो. सोशल मीडियाद्वारे एकमेकांसोबत संवाद साधताना आपण इमोजीचा वापर करतो. चॅट, पोस्ट किंवा कमेंट करताना इमोजीचा वापर होऊ लागला आहे. त्यामुळे इमोजी आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे, असे म्हटले, तरी चुकीचे ठरणार नाही. इमोजीमुळे आपण आपल्या मनातील भावना किंवा चेहऱ्यावरील हावभाव समोरच्यापर्यंत उत्तमरित्या पोहोचवू शकतो.

इमोजीचा शोध जपानमध्ये लागल्याचे सांगितले जाते. शिगेताका कुरिता यांनी १९९८ मध्ये इमोजीचा शोध लावला. जगातील पहिला इमोजी त्यांनी एका टेलिकॉम कंपनीसाठी तयार केला होता. ९० च्या दशकाच्या शेवटी इमोजीचा शोध लागला. शिगेताका कुरिता एका एनटीटी डोकोमो या टेलिकॉम कंपनीसाठी काम करत होते. मेसेजमध्ये आपली भावना अधिक चांगल्याप्रकारे मांडण्यासाठी त्यांनी फोटो ऐवजी कॅरेक्टर वापरण्याची संकल्पना मांडली, यातूनच इमोजीचा जन्म झाला.

पूर्वी ईमेल पाठवण्यासाठी अक्षरांची संख्या फक्त २५० होती. लोकांना त्यांच्या भावना इतक्या कमी शब्दांत समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवता येत नव्हत्या. ही अडचण दूर करण्यासाठी कुरिता यांनी पहिल्यांदा इमोजी बनवण्यास सुरुवात केली. १९९८ च्या शेवटी आणि १९९९ च्या सुरुवातीला इमोजीचा वापर सुरू झाला. त्यानंतर हळूहळू २०१० नंतर इमोजीचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. १९९९ मध्ये शिगेताका कुरिता यांनी इमोजीचा पहिला सेट जारी केला. या इमोजी सेटमध्ये स्माईली, राग अशा वेगवेगळ्या भावनांचे इमोजी होते. २०१४ पासून १७ जुलै रोजी जगभरात 'इमोजी डे' साजरा केला जातो. इमोजीपीडिया ही एक युनिकोड मानक ऑनलाइन वेबसाइट आहे. ही वेबसाईट इमोजी आणि त्यांच्या डिझाइनची नोंदणी करते. इमोजीपीडियाचे संस्थापक जेरेमी बर्गे यांनी २०१४ मध्ये पहिल्यांदा 'इमोजी डे' साजरा करण्यास सुरुवात केली होती. २०१० मध्ये इमोजींचा वापर वाढला आणि 'वर्ल्ड इमोजी डे' जगभरात साजरा होण्यास सुरुवात झाली.

आज बहुतेकजण आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी इमोजी पाठवितात. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम आणि व्हाट्सॲपसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इमोजीचा वापर सर्वाधिक केला जातो. एसएमएस, एमएमएस सारख्या मेसेजिंग ॲप्लिकेशन्स मध्येही इमोजी लोकप्रिय आहेत. काही वेबसाइट्स आणि ब्लॉग इमोजीचा वापर त्यांच्या ब्लॉगपोस्टला अधिक आकर्षक बनवण्यासाठी करतात. एकूणच इमोजी भावना, कल्पना आणि संदेश व्यक्त करण्यासाठी वापरले जातात. ते मजकूराचा अर्थ स्पष्ट करण्यास, विनोद व्यक्त करण्यास आणि संवाद अधिक मनोरंजक बनवण्यास मदत करतात. पण, इमोजीचा वापर करताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. योग्य इमोजी निवडणे महत्त्वाचे आहे. चुकीचा इमोजी निवडल्यास चुकीचा संदेश पोहोचू शकतो. काही इमोजींचे अनेक अर्थ असू शकतात. त्यामुळे पुढील व्यक्तीचा गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असते. खूप जास्त इमोजी वापरल्याने अर्थबदल होऊन संदेश गोंधळात टाकू शकतो. इमोजी हे डिजिटल संवादाचा एक महत्त्वाचा भाग बनले आहेत. ते आपल्या भावना आणि कल्पना व्यक्त करण्याचा एक मजेदार आणि गतिमान मार्ग प्रदान करतात. योग्यरित्या वापरल्यास, ते संवाद अधिक प्रभावी आणि आनंददायी बनवू शकतात. पण, ते वापरतानाही काळजी घेणे गरजेचे आहे.

वाचक विचार मंच

जनतेनी फुकटच्या योजनांना बळी पडू नये!

नरेंद्र मोदी यांनी दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत. नोटाबंदी व जी.एस.टी. करप्रणालीतून त्यांनी अनैतिकतेचा आणि भ्रष्टाचाराचा कळस गाठला. देशात महागाई निर्माण झाली, ४०रु. प्रति किलो गोडेतेल १२० ते १४० रुपयांपर्यंत गेले. गॅस सिलेंडरचा भाव ४५० रुपयांवरून ९०० रु. प्रति सिलेंडर करून ग्रामीण भागात चुली पेटल्या. सोयाबीन शेतकऱ्यांच्या घरी आले, की तोच माल विदेशातून आयात करून सोयाबीनचे भाव पाडले जातात. पीक कर्ज मिळत नाही. शेतीमालास योग्य भाव मिळत नाही. शेतकरी सावकारी कर्जात बुडाले. सावकारांच्या त्रासास कंटाळून शेतकऱ्यांनी जीवन संपविले. नरेंद्र मोदी हे अंबानी-अदानीचे सेवक बनून देशात हुकूमशाही राबवत आहेत. मोदींनी विमानसेवा व रेल्वे सेवा खासगीत सुरू केल्या. आता एस.टी. महामंडळ खासगीत करणार. शेती लीजवर घेऊन शेतकऱ्यांना मजूर बनवून देशाचा खासगीत व्यवहार सुरू करणार. जनतेनी फुकटच्या मालास- गहू, तांदुळास बळी पडू नये.

दिगंबर शिंदे हरबळकर, लोहा, जि. नांदेड
मो. नं.: ९०११६३४२११

सायबर फसवणुकीचा नवा घातक प्रकार!

सायबर गुन्हे करणाऱ्यांच्या कृत्यांवर संशोधन करणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय पथकाने सायबर गुन्हे घडणाऱ्या शंभर देशांतील घडलेल्या सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यांचे मोजमाप केले असता त्यात भारत दहाव्या स्थानावर असल्याचे दिसून आले आहे. आघाडीवरील रशियानंतर युक्रेन, चीन, अमेरिका, नायजेरिया, रोमानिया आणि उत्तर कोरिया अशा देशांचा क्रम आहे. सध्या 'डिजिटल हाऊस अरेस्ट' या प्रकारच्या घातक पद्धतीत लोकांना भयभीत केले जाते आणि मागणी केलेली रक्कम मिळेपर्यंत 'हाऊस अरेस्ट'पासून सुटका केली जात नाही. जगात उपलब्ध होत असलेल्या तंत्रज्ञानाचा गैरवापर करून हॅकर्स, सायबर गुन्हेगार नवे फंडे वापरून ऑनलाईन फसवणुकीच्या प्रकारांत सामान्यांना गुंतवून आपले उद्देश साध्य करीत असतात. गेल्या दशकात बँकांमार्फत फसवणुकीचे ६५ हजारांवर गुन्हे दाखल झाले आहेत. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये ३० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची आर्थिक फसवणूक झाली आहे. सामान्यांनी अपरिचित, अज्ञात क्रमांकावरून येणाऱ्या फोनवर उत्तर देणे किंवा संभाषण सुरू ठेवणे टाळावे, असे सुचवावेसे वाटते.

स्नेहा राज, गोरेगाव, मो. नं.: ९९६७०१५८९९

धुमस

रोखठोक

आपण म्हणे लोकाला
अन् शेंबूड आपल्या नाकाला
विरोधकांच्या सवालाचे
उत्तर देता येईल का एकाला?

म्हणे भ्रष्टाचाऱ्यांचा सरदार
असं लावलं ज्यांनी दूषण
मग कसे काय दिले
त्यांनी पद्मविभूषण?

पंचवीस वर्षे सोबत राहून
घेतलं तुम्ही सत्तासुख
आज औरंगजेब फॅन क्लबचे
त्यांनाच म्हणता प्रमुख

'आदर्श' मशागत बघून
भले भले चाट झाले
'अशोक'वनात 'कमळ' उगवताच
कृषीतज्ञही 'फ्लॅट' झाले

किती केला आरडाओरडा
त्यांच्या धरणात 'मुतण्या'ला
सत्तरहजार कोटींचा घोटाळा
माफ केला का पुतण्याला?

विरोधकांनी उत्तर दिले
त्यांच्या प्रत्येक वाक्याला
अति 'शहा'णा, त्याचा बैल रिकामा
सांगा हे तथाकथित 'चाणाक्या'ला

ॲड. अनंत खेळकर
अकोला

जगभ्रमंती

...ही आहे भारतातील सर्वात लांब ट्रेन

सहा इंजिनची ट्रेन असते असे म्हटले, तर तुम्हाला विश्वास बसणार नाही. तुम्ही म्हणाल की, अशी काय ट्रेन असते का? तसंच तुम्हाला प्रश्न पडेल की, सहा इंजिनची ट्रेन अखेर किती डब्यांना ओढत असेल. मात्र, ट्रेनने हजारो, लाखो लोक दररोज प्रवास करतात. ज्यामुळे ट्रेनची लांबी तशीही खूप मोठी असते; पण काही ट्रेन अशा असतात, ज्यांना ओढण्यासाठी अनेक इंजिनची गरज असते. भारतातील सर्वात लांब ट्रेन कोणती असा प्रश्न तुम्हाला पडला असेल, तर आज आपण याविषयी जाणून घेऊ या.

तुम्ही अनेकदा वेगवेगळ्या ट्रेनमधून प्रवास केला असेल. खरंतर, भारतीय लोकांना एका शहरातून दुसऱ्या शहरात आणि एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाण्यासाठी ट्रेन हा सर्वात स्वस्त आणि उत्तम मार्ग वाटतो. ट्रेनमधील प्रत्येक वर्ग लक्षात घेऊन डबे ठरवले जातात. भारतात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी ट्रेनपेक्षा चांगले काहीच नसेल.

..ही आहे भारतातील सर्वात लांब ट्रेन: या ट्रेनबद्दल फार कमी लोकांना माहिती असेल. सुपर वासुकी ट्रेन ही भारतातील सर्वात लांब ट्रेन म्हणून ओळखली जाते. या ट्रेनची रंजक गोष्ट म्हणजे स्वातंत्र्य दिनाच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त ही ट्रेन सुरू करण्यात आली. या ट्रेनला २० किंवा ३० डबे नसून २९५ डबे आहेत. ज्यांना सोबत घेऊन ही ट्रेन चालते. आश्चर्याची बाब म्हणजे ही ट्रेन सुमारे ३.५ किलोमीटर लांब आहे. हे डब्बे मोजायला बसले तर किमान एक तास लागेल.

भारतीय रेल्वेद्वारे चालवली जाणारी सर्वात लांब मालगाडी म्हणजे सुपर वासुकी आहे. ही ट्रेन छत्तीसगड ते कोरबा येथून रवाना होते आणि नागपूरच्या राजनंदगावपर्यंत चालते. या प्रवासासाठी ट्रेनला जवळपास ११.२० तासांचा वेळ लागतो.

सुपर वासुकीला मालगाडीचे स्वरूप देण्यासाठी पाच मालगाड्यांचे रेक एकत्र जोडले गेले आहेत. या ट्रेनद्वारे वाहून नेलेला एकूण कोळसा संपूर्ण दिवसासाठी ३,००० मेगावॅट पॉवर प्लांटला आग लावण्यासाठी पुरेसा आहे, जो सध्याच्या ट्रेनच्या क्षमतेपेक्षा तिप्पट आहे. ही ट्रेन एका प्रवासात जवळपास ९,००० टन कोळसा घेऊन जाते.

गुल्लेर

नरेंद्र इंगळे
9561226572

खोली पाह्यजे!

'आहेत काय मालक घरी? खोली पाह्यजे भाड्यानं.'

'किती जनं राह्यतीन?'

'एक पोरगी आहे अन एक तिची माय.'

'पोरगी किती वर्षाची आहे?'

'पोरगी अठरा वर्षाची.'

'तिची माय?'

'तिच्या दुप्पट धरुन घ्या.'

'दोघीच राह्यतीन काय?'

'मी चक्कर मारत जाईन मंधातून.'

'तुम्ही मुक्कामी राह्यसान काय?'

'झळीपानी असलं त राहीन.. खोली दाखोता काय?'

'केवढी पाह्यजे खोली? मोठी की लायनी?'

'साधारन चालते.'

'तसे आम्ही जवान पोरगी असली की खोली देत नाही.'

'काहून?'

'रिकामे पोट्टे तरास देतात.'

'तसं काही व्हनार नाही..पोरीची गॅरंटी हाय.'

'कोन्या वर्गात हाय पोरगी?'

'बारावीत गेली.. तशी ते खोलीवर थांबतच नाही. कॉलेज अन टिवशना.. यातच बेदम होते.'

'पोरगी खोलीवर थांबनार नाही म्हनता, मंग तुमच्या घरची काय करीन एकटी?'

'ते झोपा काढीन.. नाहीतर पोथी वाचीन.. तुमाले काय करा लागते?'

'बरं वरची खोली पाहून घ्या.'

'काय भाडं आहे खोलीचं?'

'तीन हजार.'

'मारला मानूस.. छटाकभर खोलीचे तीन हजार? याच्यात दोन मानसं लंबे पाय करत नाहीत.'

'लाईटचं बील अलग लागीन.'

'तीन हजारातच लाईट बील लावा.'

'लाईट बील अलग असते..सबमिटर आहे.'

'मंग त लय उलाय जाते. साडेतीनात पक्क करा.'

'खाली काही मागाले यायचं नाही. भाडेकरुचा लय तरास असते.. तेल द्या.. मीठ द्या.. बेसन द्या..'

'ते सगळं घरुन आनतो मी..'

'पह्यले एका मयन्याचा ॲडव्हांस जमा करा लागीन. दर एक तारीखले पैसे लागतीन. उशीर केला की पन्नास रुपये रोजचा चार्ज लागीन.'

'राहू द्या.. मी दुसरी खोली पाह्यतो.. एवढी चौकशी असते काय?'

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

एलएलबी प्रवेशास मिळाली मुदतवाढ

सीईटी सेलचा निर्णय

देशोन्नती वृत्तसंकलन

नागपूर : पदवी अभ्यासक्रमानंतर विधि शाखेतील तीन वर्षांच्या एलएलबी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची प्रक्रिया सध्या सुरू आहे. याअंतर्गत नोंदणी प्रक्रियेला मुदतवाढ देण्याचा निर्णय सीईटी सेलने घेतला आहे. त्यानुसार बुधवार, २४ जुलैपर्यंत नोंदणी करता येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश सध्या सुरू आहेत. याअंतर्गत तीन वर्षांच्या एलएलबी अभ्यासक्रमाकरिता प्रवेश नोंदणीची मुदत शुक्रवार, १९ जुलैपर्यंत होती. निर्धारित मुदतीत नोंदणी करू न शकलेल्या विद्यार्थी, पालकांनी सीईटी सेलला फोनद्वारे व ई-मेलच्या माध्यमातून संपर्क साधताना मुदतवाढ देण्याची विनंती केली होती. त्यानुसार आता सीईटी सेलने नोंदणीला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. सीईटी परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना नोंदणीसाठी २४ जुलैपर्यंत मुदत असणार आहे. दरम्यान, या मुदतवाढीच्या निर्णयामुळे पुढील प्रवेश वेळापत्रकाच्या तारखांमध्येही बदल होणार आहे. यापूर्वीच्या वेळापत्रकानुसार उद्या मंगळवारी प्रारूप गुणवत्तायादी प्रसिद्ध होणार होती. परंतु आता नोंदणीच्या मुदतीत वाढ केल्याने नोंदणीकृत विद्यार्थ्यांना कागदपत्रे पडताळणीसाठी वेळ द्यावा लागणार आहे. त्यामुळे मुदतवाढीचा निर्णय जाहीर केला असला, तरी त्यासोबत सुधारित प्रवेश वेळापत्रक जाहीर केलेले नाही. त्यामुळे पुन्हा मुदतवाढ दिली जाते की वेळापत्रक जाहीर करून त्यानुसार पुढील प्रक्रिया राबविली जाते. याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

गुणवत्ता यादी प्रसिद्ध

बारावीनंतर पाच वर्षांच्या एलएलबी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला सुरुवात झाली आहे. १९ जुलै रोजी अंतिम गुणवत्तायादी प्रसिद्ध केली गेली आहे. आता विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचा पसंतिक्रम नोंदविण्यासाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची २२ ते २५ जुलैपर्यंत मुदत असेल. पहिल्या फेरीची निवड यादी २९ जुलैला प्रसिद्ध होऊन विद्यार्थ्यांना ३० जुलै ते २ ऑगस्टदरम्यान प्रवेश घेण्याची संधी असेल.

* * *

✦ राज्यसरकारची महिलांसाठी आणखी एक मोठी योजना जाहीर

रिक्षासाठी २० टक्के रक्कम मिळणार

देशोन्नती वृत्तसंकलन

मुंबई :राज्यात मागील काही दिवसांपासून लाडकी बहीण या योजनेची जोरदार चर्चा सुरु आहे. अशातच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिलांसाठी आणखी एक मोठी योजना जाहीर केली आहे.

राज्यातील १७ शहरांमधील १० हजार महिलांना या योजनेचा फायदा मिळणार असून या योजनेच्या अंतर्गत रिक्षा खरेदीची २० टक्के रक्कम ही सरकार देणार आहे. महिलांना रोजगार मिळावा या हेतूने सरकारने ही योजना आणली आहे.

याबाबत अजित पवार यांनी सांगितले की, 'आम्ही महिलांसाठी आणखी एक योजना आणली आहे. गुलाबी रिक्षा असं या योजनेचं नाव असून या योजनेतून २० टक्के रक्कम महिलेने भरावयाची असून २० टक्के सरकार तर ७० टक्के बँक लोनमधून उपलब्ध करुन दिले जाणार आहे .

महाराष्ट्र सरकार जाहीर केलेल्या पिंक ई रिक्षा योजनेंतर्गत राज्यातील सर्व पात्र महिलांना ई रिक्षा खरेदी करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येईल. यासाठी कमाल आर्थिक सहाय्य रु. ८०,०००/- प्रदान करण्यात येतील. लाभार्थी महिला महाराष्ट्राच्या कायम रहिवासी असणे गरजेचे आहे. त्याशिवाय लाभार्थी महिलांकडे वैध ड्रायव्हिंग लायसन्स असावे लागते.

आवश्यक कागदपत्रे

लाभार्थी महिलेकडे महाराष्ट्राचा रहिवासी पुरावा, आधार कार्ड, चालक परवाना, मोबाईल नंबर, बँक खाते तपशील आणि पासपोर्ट साइज फोटो असावा.

* * *

दूध भाववाढी साठी ट्रॅक्टर रॅली

देशोन्नती वृत्तसंकलन

नगर : दुधाला प्रति लिटर ४० रुपये भाव मिळावा या मागणीसाठी कोतुळ या ठिकाणावरून संगमनेर प्रांत कार्यालयावर भव्य ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

शेकडो ट्रॅक्टर घेऊन ही रॅली कोतूळ वरून आता मार्गस्थ होत ट्रॅक्टर या रॅलीमध्ये सहभागी झाले. पंजाब पॅटर्न अकोल्यात साकारत दूध उत्पादकांनी जबरदस्त आंदोलन उभे केले आहे. दुधाला ४० रुपये प्रति लिटर भाव मिळाला पाहिजे, पशुखाद्याचे दर कमी झाले पाहिजे, दुधाला एफ. आर. पी. व रेव्हेन्यू शेरिंगचे धोरण लागू झाले पाहिजे. दूध भेसळ थांबली पाहिजे या प्रमुख मागण्यांसाठी १८ दिवस कोतुळ या ठिकाणी शेतकरी आंदोलन करत आहेत, या मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला केंद्रस्थानी आणण्यासाठी ही ट्रॅक्टर रॅली काढण्यात आली आहे.

* * *

शेती पिकांचे नुकसान ठरविण्यासाठी अद्ययावत प्रणाली

मुंबई : शेती पिकांचे नुकसान ठरविण्यासाठी लवकरात लवकर अद्ययावत प्रणाली विकसित करावी जेणेकरून ही नुकसान भरपाई अधिक पारदर्शकतेने व अचूकपणे देता यावी असा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. ही प्रणाली सुरु होईपर्यंत प्रचलित पद्धतीने नुकसान भरपाईची मदत देण्यात येईल. १ जुलै २०२४ रोजी यासंदर्भात झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत सामान्यकृत फरक वनस्पती निर्देशांक (एनडीव्हीआय) निकषासाठी पूर्ण अद्ययावत प्रणाली कृषी विभागामार्फत तयार होत नाही तोपर्यंत प्रचलित धोरणांप्रमाणे शेती पिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत निर्णय झाला होता.

* * *

डेंगू हा जीव घेणा आजार : आयुक्त यशवंत डांगे यांनी साधला संवाद

देशोन्नती वृत्तसंकलन

रेसिडेन्सीयल विद्यालयातील विद्यार्थ्यांची आयुक्त यशवंत डांगे यांनी संवाद साधत म्हणाले की, समाजामध्ये विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे महत्त्व पटवून द्यावे व मोबाईलचा अतिवापर कमी करून रील पाहू नये जास्तीत जास्त खेळाकडे व अभ्यासाकडे लक्ष द्यावे असे ते यावेळी म्हणाले.

नगर : संत गाडगेबाबा यांनी समाजाला स्वच्छतेचे महत्व पटावे यासाठी स्वतः आता झाडू घेऊन गावोगावी कीर्तनाच्या माध्यमातून प्रसार व प्रचार करत होते, आजही आपण स्वच्छतेवर काम करत असूनआपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत स्वच्छ अभियानाच्या माध्यमातून स्वच्छतेची लोक चळवळ उभी केली आहे, यामध्ये आपल्या सर्वांना सहभागी होत स्वच्छतेची सुरुवात आपल्या स्वतःपासून घरापासून व परिसरापासून सुरू करावी, स्वच्छतेच्या माध्यमातून देशाची प्रतिमा राष्ट्रीय पातळीवर उंचावण्यास मदत होते, घरामधील ओला व सुका कचरा वेगळा करून घंटागाडीतच टाकावा जेणेकरून कंपोस्ट खत निर्माण होईल, आपण जमिनीतून अन्न पाणी घेतो ते आपण जमिनीला परत दिले पाहिजेत, यासाठी कचऱ्यावर प्रक्रिया होणे गरजेचे आहे, सुक्या कचऱ्यावर देखील प्रक्रिया करून त्याचा वापर आपल्याला पुन्हा करता येतो, रेसिडेन्सी हायस्कूल मधील विद्यार्थ्यांची सहल काढून मनपाच्या खत प्रकल्प पाणीपुरवठा प्रकल्प व सांडपाणी प्रकल्पाला भेट देऊन माहिती द्यावी, लोकमान्य टिळकांनी स्वतंत्र काळामध्ये स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि ते मी मिळवणारच या प्रमाणे आपण सुद्धा स्वच्छतेवर काम करून डेंगूमुक्त नगर शहर निर्माण करणार असा निश्चय करावा डेंगूचा डास हा दिवसा चावतो त्याची निर्मिती स्वच्छ पाण्यात होत असते. डेंगू हा जीवघेणा आजार असून विद्यार्थ्यांनी दर रविवारी पुढील आठ आठवडे स्वच्छतेवर काम करावे व समाजामध्ये जनजागृती करावे जेणेकरून नागरिकांचे आरोग्य सदृढ निरोगी राहण्यास मदत होईल असे आवाहन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले

रेसिडेन्सीअल विद्यालयातील विद्यार्थ्यांशी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी स्वच्छतेबाबत संवाद साधला. यावेळी मनपा आरोग्य अधिकारी अनिल बोरगे, प्राचार्य व्ही के पोकळे, बी एम पवार, डी सी म्हस्के, आदींसह शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी रेसिडेन्सीअल मधील विद्यार्थ्यांच्या वतीने स्वच्छतेवर नाटिका तयार करत गाण्यावर नृत्य सादर केले यावेळी विद्यार्थ्यांना जनजागृतीसाठी पत्रक वाटण्यात आले.

* * *

आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तकांनाअपघातासाठी मिळणार १० लाख

देशोन्नती वृत्तसंकलन

मुंबई : आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, गटप्रवर्तकांना सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला असून अपघाती मृत्यू आल्यास दहा लाख आणि अपंगत्वासाठी पाच लाख रुपये अनुदान देण्यात यावे असे आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठरले. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी प्रति वर्षी अंदाजे १ कोटी ५ लाख रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला. हा निर्णय १ एप्रिल २०२४ पासून लागू करण्यात येईल. सध्या ७५ हजार ५७८ अशा स्वयंसेविका आणि ३६२२ गटप्रवर्तक कार्यरत असून त्या आरोग्यासंदर्भात महत्त्वपूर्ण जबाबदारी सांभाळतात. हे करताना अपघाती मृत्यू आल्यास किंवा अपंगत्व आल्यास त्यांना आर्थिक सहाय्य व्हावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

* * *

जळेश्वर रथयात्रा उत्साहात साजरी

देशोन्नती वृत्तसंकलन

यात्रेदरम्यान पाच दिवस चोख बंदोबस्त

नगर : गुरूपोर्णिमेनिमित्त जामखेड तालुक्यातील जवळा येथे श्री जवळेश्वर रथयात्रा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त लाखो भाविकांनी रथयात्रेला हजेरी लावत, श्री जवळेश्वराचे दर्शन घेतले.

श्री जवळेश्वर रथयात्रा राज्यात प्रसिध्द असून, गुरूपोर्णिमेनिमित्त साज-या होणा-या रथयात्रेला वेगळे महत्व आहे. रथयात्रेनिमित्त सकाळी जवळेश्वर मुकुटाची आरती करून, रथामध्ये प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली. यावेळी भाविकांनी रथाचे दर्शन घेतानाच नारळाचे तोरण रथाला अर्पण केले. दुपारी एक वाजता रथाची महाआरती करून, मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला. रथ मिरवणूक विठ्ठल मंदिर, बसस्थानक, मराठी शाळा, बाजारतळ मार्गे सायंकाळी सातच्या दरम्यान वेशीच्या आत आली. यावेळी मारूती मंदिरावर दहीहंडी फोडून, फटाक्यांची आतषबाजी करून आनंद व्यक्त करण्यात आला.

रात्री बारा वाजणेच्या सुमारास रथयात्रा जवळेश्वर मंदिरासमोर आल्यानंतर हरहर महादेवाचा जयघोष होवून, यात्रेची सांगता झाली. यात्रेनिमित्त महाआरतीला आमदार रोहित पवार , आमदार राम शिंदे यांच्या पत्नी व माजी सभापती आशा शिंदे, सामाजिक कार्यकर्ते निलेश गायवळ, जिल्हा बँकेचे संचालक अमोल राळेभात, राष्टवादीचे विधानसभा अध्यक्ष प्रा मधुकर राळेभात , बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, माजी सभापती डॉ.भगवान मुरूमकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी पोलिस निरिक्षक महेश पाटील, सहाय्यक पोलिस निरिक्षक दिलीप तारडे यांनी यात्रेदरम्यान पाच दिवस चोख बंदोबस्त ठेवला होता.

* * *

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आनंद लहामगे राष्ट्रवादीत दाखल

देशोन्नती वृत्तसंकलन

अजित पवार यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश

अहमदनगर : शिवसेनेचे (ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख आनंद लहामगे यांनी उपमुख्यमंत्री ना. अजीत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर लहामगे यांनी केलेल्या प्रवेशाला पक्षांतर्गत गटबाजीची किनार असल्याने त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश शिवसेनेला धक्का मानला जात आहे.

राज्य सरकारने सुरु केलेल्या माझी लाडकी बहीण योजनेच्या पार्श्‍वभूमीवर घेण्यात आलेल्या महिला मेळाव्यात आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली लहामगे राष्ट्रवादीत दाखल झाले. ना. पवार यांनी त्यांचे पक्षात स्वागत करुन सत्कार केला. यावेळी महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, मा.आ. अरुणकाका जगताप, सामाजिक न्याय विभागाचे सुरेश बनसोडे, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, कुमारसिंह वाकळे, प्रा. माणिक विधाते, विनीत पाऊलबुध्दे, साहेबान जहागीरदार, अमित खामकर, बाळासाहेब पवार, अभिजीत खोसे, पप्पू पाटील, नदीम शेख, अमित साळवे आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आनंद लहामगे अनेक वर्षापासून सामाजिक व राजकीय जीवनात सक्रिय असून, ते कर सल्लागार आहेत. ओबीसी समाजात देखील त्यांचे कार्य सुरु आहे. शिवसेनेच्या (ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख पदाची त्यांच्याकडे जबाबदारी होती. शहरासह जिल्ह्यात त्यांनी शिवसेना पक्ष वाढीसाठी कार्य केले आहे. राष्ट्रवादी पक्षात त्यांच्याकडे लवकरच महत्त्वाची जबाबदारी सोपविली जाण्याची शक्यता आहे.

* * *

पोलीस प्रशासनाच्या चुकीच्य
विरोधात उपोषण

अहमदनगर : जिल्हा पोलिस दलातील गैरकारभाराविरोधात खासदार नीलेश लंके यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर सुरु केलेले उपोषण दुसऱ्या दिवशी मंगळवारी देखील सुरु होते. उपोषणस्थळी भेट देऊन पोलिसांविरोधात असलेल्या तक्रारी खासदार लंके यांच्याकडे लेखी स्वरुपात देत आहेत. तर उपोषण दरम्यान खासदार लंके यांची खालवलेली प्रकृती. तसेच उपोषण स्थळी रात्रीचा ठोकलेला मुक्काम.

* * *

राजे यशवंतराव होळकर महामेष योजना पुढे सुरू ठेवणार

मेंढपाळ लाभार्थींना रक्कम थेट खात्यात जमा

मुंबई : राज्यातील मेंढपाळांसाठी असलेली राजे यशवंतराव होळकर महामेष योजना पुढे सुरू ठेवण्याचा आणि मेंढपाळ लाभार्थींना रक्कम थेट खात्यात जमा करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. राज्यातील धनगर समाजातील मागासलेपण दूर करण्याच्या उद्देशाने ही योजना २०१७ वर्षापासून सुरु होती. या योजनेत अधिकाधिक लाभार्थींना फायदा व्हावा म्हणून काही बदलासह त्यास मान्यता देण्यात आली. या वर्षासाठी महामंडळाकडे असलेल्या २९ कोटी ५५ लाख इतका निधी चालू वित्तीय वर्षात खर्च करण्यास आणि त्यानंतर ही योजना दरवर्षी अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार पुढे चालू ठेवण्यात येईल. पशुधन खरेदीच्याबाबतीत ७५ टक्के अनुदानाची रक्कम ७ दिवसात थेट लाभ हस्तांतरण प्रक्रीयेतून (डीबीटी) लाभार्थींना देण्यात येईल. तसेच चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातीचे ठोंबे व बियाणे यासाठीचे अनुदान वगळता उर्वरित सर्व लाभ डीबीटीच्या माध्यमातून लाभार्थींना देण्यात येतील.

मुंबई : मागाठाणे विधानसभा मतदारसंघातील उबाठा गटाच्या माजी नगरसेविका रिद्धी खुरसुंगे आणि गीता सिंघण यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करून त्यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

* * *

दिव्यांग कर्मचाऱ्यांना २०१६ पासून पदोन्नतीसाठी आरक्षण लागू

देशोन्नती वृत्तसंकलन

मुंबई : राज्य शासनातील दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी ३० जून २०१६ पासून पदोन्नतीसाठी आरक्षण लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

गट ड ते गट अ च्या पदांमध्ये पदोन्नतीमध्ये ४ टक्के आरक्षण ३० जानेवारी २०१६ पासून लागू करण्यात येत आहे. याचा लाभ काल्पनिक पद्धतीने गट अ च्या निम्न स्तरापर्यंत मिळेल. ३० जून २०१६ पासून ज्या दिनांकाला दिव्यांग अधिकारी किंवा कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र ठरेल त्या दिनांकापासून त्यांना काल्पनिकरित्या आरक्षणाचा लाभ देण्यात येईल. पदोन्नतीचा प्रत्यक्ष आर्थिक लाभ त्यांना प्रत्यक्षात पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून लागू होईल. या निर्णयामुळे पदोन्नती साखळीतील अंतर्गत ज्येष्ठतेवर परिणाम होण्याच्या शक्यतेमुळे गैरसोय टाळण्यासाठी ३० जून २०१६ नंतर मान्यता देण्यात आलेल्या प्रत्येक निवडसूचीतील पद संख्येनुसार आणि २० एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रत्येक शासकीय आस्थापनेने दिव्यांग आरक्षणाची गणणा करावी. तसेच पात्र दिव्यांगांची संख्या पुरशी नसल्यास अधिसंख्य पद निर्माण करावे असे देखील ठरले.

* * *

राज्यात सरासरीच्या १२३ टक्के पाऊस

देशोन्नती वृत्तसंकलन

मुंबई : राज्यात सरासरीच्या १२३.२ टक्के पाऊस झाला असून पेरण्या देखील समाधानकारक झाल्या आहेत. या संदर्भातील सादरीकरण आज कृषी विभागाने मंत्रिमंडळ बैठकीत केले.

राज्यात २२ जुलै पर्यंत ५४५ मि.मी. पाऊस झाला आहे. मागील वर्षी याच सुमारास ४२२ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ९५.४ टक्के पाऊस झाला होता. राज्यात खरीपाचे ऊस वगळून १४२.२ लाख हेक्टर क्षेत्र असून आतापर्यंत १२८.९४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१ टक्के) पेरणी झाली आहे. भात व नाचणी पिकाची पुर्नलागवड कामे सुरु असून ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, भुईमूग आणि कापसाच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत. खत आणि बियाणांची पुरेशी उपलब्धता आहे.

राज्यातील धरणांमध्ये ३९.१७ टक्के पाणीसाठा

सध्या राज्यातील सर्व धरणांमध्ये ३९.१७ टक्के पाणी साठा असून गेल्या वर्षी याच सुमारास ४३.६५ टक्के पाणी साठा होता. सर्वात कमी म्हणजे १२.१३ टक्के पाणी साठा छत्रपती संभाजीनगर येथे तसेच २८.३४ टक्के नाशिक येथे आहे. राज्यातील १ हजार २१ गावे आणि २ हजार ५१८ वाड्यांना १ हजार ३६५ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरु आहे. टँकर्सची संख्या ३२६ ने वाढली आहे.

सर्वत्र पेरण्या समाधानकारक

* * *

गुणवंत वीरशैव लिंगायतांना माहिती पाठविण्याचे आवाहन

नागपूर : समाज चेतना समिती, नंदनवनतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंतांचा गौरव करण्यात येणार आहे. समितीद्वारे गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जातो. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. समितीने यावर्षीसुद्धा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांकडून माहिती मागविली आहे. वर्ष २०२४ मध्ये इयत्ता दहावी व बारावी तसेच पदविका आणि पदवी परीक्षेत ६० टक्केपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती पाठविण्याचे आवाहन केले आहे.

ट्रान्सपोर्ट रोडमुळे उड्डाणपूल चिखलमय!

सार्वजनिक बांधकाम विभागाने खड्डे त्वरित बुजावेत

मुख्याधिकारी लक्ष कधी देणार: अँड.मनोज संकाये

नागरिकांना भोगावा लागतोय त्रास

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी येथील ट्रान्सपोर्ट रोडमुळे डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावर येणाऱ्या वाहतुकीच्या वाहनांमुळे हा मार्ग चिखलमय झाला आहे. याचा तेथील नागरिकांना त्रास भोगावा लागत असून वाहतूकदारांना सुद्धा अडचणीचा सामना करावा लागत आहे. नागरिकांची या त्रासातून सुटका व्हावी तसेच पुलावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्त करावे आणि मंजूर झालेल्या ट्रान्सपोर्ट रोजचे काम त्वरित सुरू करावे अशी मागणी नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि सार्वजनिक विभागाचे मुख्य अभियंता यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी केली आहे.



रेल्वे उड्डाणपूल ला खालील ट्रान्सपोर्ट रोड वरून मालाची वाहतूक करणारी जड वाहने ब्रिजवरून जात असतात. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे आणि त्या रोडवर चिखल साचल्यामुळे त्या वाहनांच्या चाकांना माती लागल्यामुळे सर्वत्र चिखल पसरला आहे त्याचा परिणाम म्हणून वाहनधारक तेथे त्यांचे एक्सीडेंट होत आहेत. पायी चालणारे हे सुद्धा या चिखलात घसरून पडत असल्यामुळे त्यांना मणक्याचे त्रास होत आहेत. या प्रकरणांमध्ये नगरपालिकेचे मुख्य अधिकारी श्री त्रिंबक कांबळे हे जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत असे नागरिक बोलत आहेत. परळी वैजनाथ हे ज्योतिर्लिंगाचे ठिकाण असून येथे दर्शनासाठी राज्यभरातून तसेच बाहेरच्या राज्यातून नागरिक येतात येणाऱ्या नागरिकांना परळी वैद्यनाथाचे नवल असते मात्र शहराचे मार्ग पाहिल्यास त्यांची निराशा होते. त्यामुळे उड्डाण पुलावडील मार्गावर पडलेले खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने पवित्र श्रावण महिन्याच्या अगोदर दुरुस्त करावेत अशी मागणी सार्वजनिक खात्याकडे त्यांनी केली आहे. या रोडवर सर्वत्र खड्डे पडले असून या खड्ड्यांमध्ये पाणी साचले आहे. पाणी साचल्यामुळे तेथील नागरिकांना रहदारीसाठी त्रास आणि अडचण भोगावी लागत आहे.

मालवाहतूक

पान २ वर...

महिला मोबाईल चोर पकडला !

बोंबला : महिलाही करु लागल्या मोबाईलची चोरी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरामध्ये जवळपास ३५००० हजार लोकसंख्या आहे. यासाठी दोन आठवडी बाजार भरले जातात त्यामध्ये एक शुक्रवारचा पंचायत समिती मैदानात तर दुसरा मंगळवारचा मंगळवार पेठेत भरतो त्या बाजारासाठी केज तालुक्यातून शेतकरी मोठया संख्येने बाजारात येतात . पाठीमागील कित्येक दिवसांन पासुन केज शहरामध्ये याच आठवडी बाजारामधुन अनेक बाजारासाठी आलेल्या नागरीकांचे मोबाईल चोरण्याच्या घटना घडत होत्या, आहेत मात्र पोलिस प्रशासन कोणत्याही चोरास पकडण्यात अयशस्वी होत होते अनेक कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचारी, अधिकारी असताना मात्र एकही मोबाईल चोर पोलिसांच्या हाताला न लागन्याचे कारण काय ? असा केज शहरातील जनतेत सवाल पडलेला असताना आज दि. २३ जुलै २०२४ वार मंगळवार रोजी एका तरुण मुस्लिम युवकामुळे वा त्याच्या तत्परतेमुळे महिला मोबाईल चोर पकडण्यात आल्या आहेत.या बाबत सविस्तर वृत्त असे कि आज शहरातील भरगच्च भरलेला आठवडी बाजार त्यामध्ये लोकांची तुफान गर्दी आज सकाळी साधारण ११ ते १२ दरम्यान अजीज पुरा येथील एकाचा मोबाईल बाजारामध्ये चोरीला गेला होता त्यांच्या बाजुसच राहणाऱ्या सय्यद अल्ताफ (गौस) वय २४ वर्षाच्या तरुणाला हि गोष्ट कळाली तो मोबाईल चोर पकडण्यासाठी बाजारामध्ये फिरत असता वा त्याचा शोध घेत असता एक महिला दुसऱ्या बाजारासाठी आलेल्या महिलेच्या पर्समध्ये हात घालताना त्या युवकास दिसली असता. त्याने तात्काळ त्या महिलेजवळ जाऊन तिला मोबाईल चोरताना पकडले व तुझ्या

पान २ वर...

..म्हणून घेतला उपोषण करण्याचा निर्णय!

निवेदन : एकाला मुलापासून तर दुसऱ्याला हवे शेतीचे संरक्षण

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध राजकीय पक्षाचे संघटनेचे धरणे उपोषणे सतत सुरू असतात मात्र आज दोन तब्बल ८० वर्षाचे एक पुरुष एक महिला आमरण उपोषणाला बसलेले दिसले या दोन्ही नागरिकांच्या संदर्भात चौकशी केली असता एकाला आपल्या स्वतः च्या मुलापासून तर दुसऱ्याला शेतीला संरक्षण हवे यासाठी आमरण उपोषणाला बसण्याची वेळ आली आहे अंबाजोगाई शहराच्या परिसरात राहणारे किशनलाल परदेशी यांची जमीन गट नंबर ४३६ मध्ये आहे ते अपंग आहेत त्याच्या इतर भावांनी त्यांच्या हिश्याची जमीन विक्री केली मात्र किशनलाल परदेशी यांनी कोणालाही आपली जमीन विक्री केली नसताना त्यांच्या जमिनीवर लोमटे अतिक्रमण करून त्यांना बेदखल करत आहेत अशी त्यांची तक्रार आहे त्यांनी परदेशी यांच्या जमिनीवर कब्जा केल्याचे म्हटले आहे प्रशासनाने

आपली जमीन सुरक्षित आपल्या ताब्यात द्यावी यासाठी किशनलाल परदेशी उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत पोटच्या मुलापासून संरक्षण आहे अंबाजोगाई शहरातीलच ताराबाई रामभाऊ कुरे वय ८० वर्षे वयाच्या आजीबाईला एकुलता एक मुलगा आहे पतीचे काही वर्षांपूर्वी निधन झाले म्हातारपणी

पान २ वर...

इनामी जमीनीची बेकायदेशीर खरेदी विक्री

सय्यद सलिम बापु : धारुर तालुक्यातील प्रकार

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील खिदमतमाश इनामी जमीनीची होत असलेली बेकायदेशीर फेरफार व खरेदी – विक्री तात्काळ थांबवण्यात यावी व हे प्रकरण स्वतः हाताळून संबंधीत दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अन्यथा मंगळवार दिनांक ३० जुलै २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव समोर बेमुदत अमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापु यांनी दिनांक २२ रोजी उपविगीय अधिकारी माजलगाव यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

धारूर तालुक्यातील दर्गा, मस्जीद, कब्रस्तान, ईदगाह तसेच गायरान जमिनी खिदमतमाश असताना वर्ग – २ च्या जमिनी बेकायदेशीररित्या वर्ग – १ मध्ये रूपांतरित करण्यात आलेले आहेत. याला जबाबदार येथील तहसीलदार , नायब तहसीलदार ,

मंडळ अधिकारी नजीर कुरेशी, तलाठी मुळे , मंडळ अधिकारी केदार , तसेच नगरपरिषद मुख्याधिकारी धारूर , सहदुय्यम निबंधक धारूर या सर्वांनी भूखंड माफीचाशी संगणमत करून खिदमतमाश जमिनीची खरेदी–विक्री केलेली आहे. व वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करून कोट्यावधी रुपयांची माया भुखंड माफियांच्या घशात घातलेली आहे.

धारूर तालुक्यातील ईनामी जमीनी सर्वे नं. ३६२ , ३६७ , ३७० , ६२२ , ६२३ , ६२४ , ५९९ , ५०२ , ५४८ , १०. ५४८ / ११. ५४८ / १३.५४८, १३५ , १८३ , १८५ ,१८६ , १८७ , १३३ , १८४ ,१८५ , ५५४ ,२०५ , २०६ , ३४३ , ३५ , ३५१, ३५२, ३५४, ३५६, ३५७, ३६०, ३४.३६५, ३७२,३७६, ५५१,

पान २ वर...

तलाठी सज्ञा पुनर्रचना करणे गरजेचे

आ.संदीप क्षीरसागर : महसूली असुसूत्रतेमुळे शेतकर्यांना त्रास

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महसूल प्रशासनाचे कामकाज सोयीचे व्हावे आणि शेतकऱ्यांना तात्काळ सेवा मिळण्याची सुविधा व्हावी याकरिता आवश्यक ठिकाणी तलाठी सज्ञा पुनर्रचना करून आवश्यक गावांमध्ये नवीन सज्ञा निर्मिती करणे गरजेचे आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना होणारा त्रास थांबेल. यावर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

बीड तालुक्यातील लक्ष्मी आई तांडा हे गाव पूर्वी नाळवंडी ग्रामपंचायत अंतर्गत येत होते. परंतु गेल्या दहा वर्षांपासून म्हणजेच दोन ग्रामपंचायत निवडणुका स्वतंत्र स्वरूपात झाल्या आहेत. त्यामुळे या गावाचे स्वतंत्र अभिलेखे तयार करणे गरजेचे आहे. गेल्या ४ वर्षांपासून आ.क्षीरसागर यांनी या विषयाय स्वतः पाठपुरावा केलेला आहे. परंतु आजतागायत या संदर्भात प्रशासनाकडून लक्ष्मी आई तांडा या गावाचे स्वतंत्र अभिलेखे तयार करण्यास दिरंगाई केली आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांना महसूल विभागाच्या संबंधित कामकाजास अनेक अडचणी येत आहेत. यावर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करून लक्ष्मी आई तांडा गावाचे स्वतंत्र अभिलेखे तयार करावेत. तसेच बीड तालुक्यातील महाजनवाडी हे गाव लिंबागणेश मंडळातील बोरखेड सज्ञामध्ये येते. महसूली कामांच्या अनुषंगाने महाजनवाडी ग्रामस्थांना विविध अडचणी येत असल्याने येथील ग्रामस्थांनी ग्रामपंचायत, ग्रामसभा, सेवा सहकारी सोसायटीचा ठराव तसेच निवेदनाद्वारे महाजनवाडी तलाठी सज्ञा नवनिर्मितीसाठी आग्रही भूमिका घेतली आहे. त्यामुळे गावकर्यांच्यावतीने

पान २ वर...

आता उपोषणातून माघार नाही

आक्रमक : पत्रकार रोहन गलांडेंचे उपोषण

अमरण उपोषण
उपोषणकर्ते
रोहन दादा गलांडे पाटील

केज/पुण्यभूमी प्रतीनिधी

मराठ्यांचे दैवत श्री. मनोज जरांगे पाटील यांनी जरी उपोषणाला स्थगिती दिली असली तरी तरी मराठ्यांचे दैवत श्री. मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी वेळ दीला आहे तरी श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषणन सुरू राहील असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे सकाळी १२ वाजता रोहन गलांडे पाटील आमरण उपोषणाला बसले आहेत . रोहन गलांडे यांनी असे म्हटले आहे की मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी जरी उपोषणाला स्थगिती दिली असली तरी श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत माझे अमरण उपोषन सुरुच राहणार आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज मंदिरासाठी तीर्थक्षषासाठी ५० लाख रुपये मंजूर झालेल्या निधीचे वितरण करून श्री संत

पान २ वर...

संत सावता महाराज सप्ताह

आध्यात्मिक : पंचक्रोशीतील भक्तांनी सप्ताहाचा लाभ घ्यावा

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोलीमाळी श्री. संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन चिंचोली माळी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले असून सप्ताहाला सुरुवात दि.२७/०७/२०२४ पासुन प्रारंभ होईल तसेच सप्ताह निमित्त आयोजित करण्यात आले आहे पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ७ ते ९ विष्णु सहस्त्रनाम, ९ ते १० नाष्टा, १० ते १२ गाथा भजन, १२ ते १ भोजन व विश्रांती, २.३० ते ४.३० श्री संत सावता महाराज चरित्र ग्रंथ वाचन, ५ ते ६ हरिपाठ, सायं. ७ ते ९ भोजन, रात्री ९ ते ११ हरिकिर्तन, ११ ते ४ हरिजागर तसेच रोज रात्री ९ ते ११ वेगवेगळ्या महाराजांचे किर्तन जसे की सप्ताहाच्या पहील्या दिवशी ह.भ.प. महंत भगवान महाराज पुरी, दुसऱ्या दिवशी ह.भ.प. पंकज महाराज थोरे (भागवताचार्य),तीसऱ्या दीवशी ह.भ.प. कांताबाई महाराज (भागवतकथाकार), चौथ्या दिवशी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे (रामायणाचार्य), पाचव्या दिवशी ह.भ.प. सुमंत महाराज डाके (भागवतकथाकार), सहाव्या दिवशी ह.भ.प. प्रकाश महाराज साठे (विद्याविनोद वैभव), सातव्या दिवशी ह.भ.प. शिवदास महाराज जंगले व शनिवार दि.०३/०८/२०२४ रोजी सकाळी १० ते १.०० ह.भ.प. महंत वासुदेवदास बाबा महाराज टाकळीकर काल्याचे यांचे किर्तन होईल श्री संत

पान २ वर...

राजकीय

बीडमध्ये महिला आघाडीची बैठक

बीड शिवसैनिकांनी आवळली वज्रमूठ!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. यादरम्यानच राज्यासह प्रत्येक जिल्ह्यातील उमेदवार आपापल्या मतदार संघात निवडणुकीसाठी कंबर कसत असून मतदारांची बांधणी मोठ्या ताकदीने करत आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप तथा सचिन भैय्या मुळूक यांच्या सूचना मार्गदर्शनाखाली काल दि. २३ जुलै रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना महिला आघाडी संपर्कप्रमुख सविता किंवांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेना महिला आघाडी जिल्हा बैठक संपन्न झाली तर शिवसेना

शहरप्रमुख नंदकिशोर पिंगळे यांनी बीड शहराचे पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या दोन्ही बैठकीमध्ये बीड विधानसभा निवडणुकीची रणनीती तयार करण्यात आली असून महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष तथा लाडके मुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे साहेबांचे हात बळाकट करण्यासाठी शिवसैनिकांनी वज्रमुठ आवळली आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेब हे अहोरात्र गोरगरीब, शेतकरी तथा सर्वसामान्यांसाठी कष्ट घेत असून राज्यातील जनतेच्या हिताच्या योजना आमलात आणत आहेत. मुख्यमंत्री शिंदे साहेब यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने सामान्य जनतेचे मन जिंकले आहे. यामुळे आगामी काळातही शिंदे सरकार सत्तेत आणण्यासाठी शिवसैनिकांनी निश्चय केला असून सर्व शिवसैनिक कामाला लागले आहेत.

वर्षानुवर्षांपासून बीड मतदार संघाची जागा ही शिवसेनेला सुटत आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी सलग चाळीस वर्ष बीडवासियांची सेवा केली आहे. जनसेवेचा एक तप त्यांनी पूर्ण केला आहे. सध्याच्या तिथील अवघ्या मतदार संघातून यंदा अनिलदादांना आमदार करूयात अशी प्रतिक्रिया उमठत आहे. अशा परिस्थितीत विधानसभेला अनिलदादा

पान २ वर...

विषमता जाळण्यासाठी आझाद क्रांती सेना

राजेश घोडे :आझाद क्रांती सेनेच्या शाखेची स्थापना

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

जायकोवाडी तालुका माजलगाव जिल्हा बीड येथे आझाद क्रांती सेनेच्या शाखेचे उद्घाटन आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश जी घोडे व अखिल बिल्डर यांच्या हस्ते पाच वाजता करण्यात आले याप्रसंगी बोलताना राजेश घोडे म्हणाले की तुम्ही जो शाखेचा बोर्ड लावला आहे हा फक्त बोर्ड नसून ही एक विचारधारा आहे ही विचारधारा म्हणजे देशामध्ये सामाजिक आर्थिक व राजकीय विषमता आहे या सर्व विषमता जाळण्यासाठी आझाद क्रांती सेना इथून पुढे काम करणार आहे १८ पगड जाती समूहाला सोबत घेऊन गावाकुसा बाहेरील माणसांचे प्रश्न

आझाद क्रांती सेना गल्लीपासून ते दिल्लीच्या तक्तापर्यंत पोहोचवण्याचं काम भविष्यात करणार आहे व सर्वसामान्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी इथल्या व्यवस्थेशी कायम झगडत राहणार आहे यासाठी हा विचार आज आपल्या गावामध्ये आलेला आहे तो विचार आपण गावागावांमध्ये घेऊन जाण्याचं काम करावं असं या प्रसन्न बोलताना राजेश घोडे म्हणाले शाखाध्यक्ष संजय हिवाळे, उपाध्यक्ष अरुण पिसुळे, सचिव करण थोरात, व सल्लागार वसंत थोरात यांनी गावच्या प्रश्नांची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावरती घेतली आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी

पान २ वर...